दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ६ । मुल्य रू. ५.०० । अंक ३० । सोमवार ९ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर अहिल्यानगरचा सराफा बाजार फुलला!



अहिल्यानगर : दिवाळी आणि लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर अहिल्यानगर शहरातील सराफा बाजारात ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत सोने-चांदीच्या दरात झालेल्या घसरणीमुळे ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला असून, खरेदीचा उत्साह वाढला आहे. लक्ष्मीपूजनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सराफा दुकानांमध्ये सकाळपासूनच ग्राहकांची लगबग सुरू आहे. सोने-चांदीचे दागिने, नाणी, कॉइन्स तसेच लक्ष्मी आणि गणपतीच्या मूर्ती खरेदी करण्याला ग्राहकांकडून पसंती दिली जात आहे. सध्या सोन्याचा दर प्रति तोळा १ लाख ४२ हजार रुपये, तर चांदीचा दर प्रति किलो १ लाख ८८ हजार रुपये असल्याने मुहूर्ताच्या खरेदीसाठी ग्राहक बाजारपेठेत दाखल होत आहेत.

विशेष संपादकीय...
करण नवले

नोटाबंदीची दहा वर्षे : ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या जखमा अजूनही ताज्याच!

८ नोव्हेंबर २०१६. रात्रीचे आठ वाजले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरचित्रवाणीवर येऊन ५०० आणि १ हजार रुपयांच्या नोटा मध्यरात्रीपासून बंद करण्याची घोषणा केली. अवघ्या चार तासांत देशातील चलनव्यवस्थाच बदलली. देशातील एकूण चलनमूल्याच्या जवळपास ८६ टक्के नोटा चलनातून बाद झाल्या. काळा पैसा, भ्रष्टाचार, बनावट नोटा आणि दहशतवादाला आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले. मात्र, या निर्णयाचा सर्वाधिक फटका बसला तो ग्रामीण भागातील सामान्य माणसाला.

शहरात बँका, एटीएम आणि डिजिटल व्यवहारांचे पर्याय काही प्रमाणात उपलब्ध होते. मात्र, ग्रामीण भागात परिस्थिती वेगळी होती. गावात बँक एक, ग्राहक हजारो! अनेक गावांत एटीएमची सुविधाही नव्हती. ज्यांच्याकडे बँक खाते होते, त्यांनाही पैसे काढण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत होते. बँकेसमोरील रांगेत तासन्तास उभे राहावे लागत होते. रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुराचा एक दिवस म्हणजे घरातील एका दिवसाची चूल पेटवण्याची चिंता होती.

नोटाबंदीचा सर्वाधिक परिणाम शेतीवर झाला. शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी बियाणे, खते, औषधे आणि मजुरांची मजुरी द्यायची होती. बाजारात शेतमाल विकला तरी व्यापाऱ्यांकडे रोख रक्कम नव्हती. शेतकऱ्यांना पैसे मिळण्यात विलंब झाला. काही ठिकाणी शेतमाल कमी दराने विकण्याची वेळ आली. भाजीपाला, दूध आणि नाशवंत माल उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. मालाला बाजारपेठ होती; पण व्यवहार करण्यासाठी पैसा नव्हता. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेली रोख पैशाची देवाणघेवाणच ठप्प झाली.गावातील किराणा दुकानदार, छोटे व्यापारी, आठवडे बाजारातील विक्रेते, बांधकाम मजूर, हातगाडीवाले आणि छोटे उद्योजक यांचे व्यवहार मंदावले. ग्रामीण भागातील बहुतांश व्यवहार आजही विश्वास, उधारी आणि रोख पैशावर चालतात. त्यामुळे नोटाबंदीचा परिणाम केवळ बँकेच्या रांगेपुरता मर्यादित राहिला नाही, तर तो प्रत्येक कुटुंबाच्या चुलीपर्यंत पोहोचला.

नोटाबंदीच्या वेळी काळा पैसा मोठ्या प्रमाणात बाहेर येईल, असा दावा करण्यात आला होता. मात्र, रिझर्व्ह बँकेच्या ऑगस्ट २०१८ मधील अहवालानुसार, रद्द झालेल्या नोटांपैकी तब्बल ९९.३ टक्के नोटा बँकिंग व्यवस्थेत परत आल्या. मग काळा पैसा नष्ट करण्याच्या मूळ उद्दिष्टाचे काय झाले, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.काळा पैसा म्हणजे केवळ घरात साठवून ठेवलेल्या नोटा नव्हेत. तो जमीन, सोने, बेनामी मालमत्ता, व्यवसाय आणि इतर गुंतवणुकीच्या स्वरूपातही असतो. त्यामुळे नोटा बदलून काळ्या पैशाचा प्रश्न पूर्णपणे सुटेल, ही अपेक्षा वास्तवाशी कितपत जुळणारी होती, याचा विचार करावा लागेल.

नोटाबंदीनंतर डिजिटल व्यवहारांना मोठी चालना मिळाली. आज यूपीआयच्या माध्यमातून कोट्यवधी लोक व्यवहार करतात. ही निश्चितच चांगली बाब आहे. मात्र, स्मार्टफोन, स्वस्त इंटरनेट, क्यूआर कोड आणि सोपी ॲप्स यांचाही डिजिटल व्यवहार वाढण्यात मोठा वाटा आहे. याचे संपूर्ण श्रेय नोटाबंदीला देता येणार नाही.विशेष म्हणजे, आज देशातील चलनातील रोकड ४३ लाख कोटी रुपयांच्या आसपास पोहोचली आहे. म्हणजेच नोटाबंदीमुळे रोख व्यवहार संपले नाहीत. ग्रामीण भागात तर आजही शेतमाल खरेदी-विक्री, मजुरी, पशुखरेदी, आठवडे बाजार आणि किरकोळ व्यवहारांसाठी रोख पैशाचे महत्त्व कायम आहे.नोटाबंदीच्या काळात कित्येक कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडले. काहींची रोजंदारी बुडाली, काहींना कर्ज घ्यावे लागले, तर काही छोट्या व्यवसायांना गाशा गुंडाळावा लागला. या नुकसानीचा नेमका आकडा आजही उपलब्ध नाही. अर्थव्यवस्था नंतर पूर्वपदावर आली, असे सांगता येईल; पण त्या काळात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे, मजुरांचे आणि छोट्या व्यावसायिकांचे नुकसान भरून निघाले का?

जानेवारी २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने नोटाबंदीचा निर्णय चार विरुद्ध एक अशा बहुमताने वैध ठरवला. मात्र, न्यायालयीन वैधता आणि आर्थिक निर्णयाचे यश या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. निर्णय कायदेशीर ठरला म्हणून तो आर्थिकदृष्ट्या यशस्वी ठरला, असे म्हणता येत नाही.लोकांनी देशहिताच्या अपेक्षेने त्रास सहन केला. सरकारवर विश्वास ठेवला. दहा वर्षांनंतर त्या विश्वासाचा हिशेब मागणे हा कोणताही राजकीय विरोध नाही, तर लोकशाहीतील नागरिकांचा अधिकार आहे.कारण, शेतकऱ्याच्या घामाचा पैसा, मजुराच्या कष्टाची मजुरी आणि सामान्य माणसाची आयुष्यभराची बचत यांचे मूल्य कोणत्याही सरकारी निर्णयापेक्षा कमी असू शकत नाही!

मुख्यमंत्र्यांची दिवाळी शेतकऱ्यांच्या बांधावर!

फडणवीस यांचा नागपूर जिल्ह्यात दौरा; शेतांची पाहणी, शेतकऱ्यांशी संवाद



मोदींकडून मुख्यमंत्र्यांचे कौतुक
शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्याच्या या उपक्रमाबद्दल फडणवीस यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

शिंदेंची दिव्यांगांसोबत दिवाळी
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिव्यांग बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी समाजातील अनेकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

'दोन्ही ठाकरे एकत्र आले तर तीच खरी दिवाळी!'
उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी एकत्र यावे, अशी सूचक भूमिका शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी मांडली. शिवसेनेत फूट पडली, तो दुर्दैवी प्रसंग पुन्हा घडायला नको होता, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नागपूर : राज्यात अवकाळी पाऊस आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी संकटात असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीच्या सणालाही शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. शनिवारी (८ नोव्हेंबर) नागपूर जिल्ह्यातील नरखेड आणि कळमेश्वर तालुक्यांचा दौरा करून ते शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत. सकाळी साडेनऊ वाजता नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथे सरपंच आणि लोकप्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर अकरा वाजता अनेक दशकांपासून रखडलेल्या खोरी जलसिंचन प्रकल्पाच्या कामाची पाहणी ते करणार आहेत. त्यानंतर दुपारी बाराच्या सुमारास कळमेश्वर तालुक्यातील कोहळी गावात शेतांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

दिवाळीच्या आनंदोत्सवात मुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत असल्याने त्यांच्या या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विशेषतः अनेक वर्षांपासून रखडलेल्या खोरी जलसिंचन प्रकल्पाला मुख्यमंत्र्यांच्या भेटीमुळे गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

दरम्यान, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रत्येक मंत्र्याने शेतकऱ्यांच्या घरी मुक्काम करून त्यांच्यासोबत भोजन करावे, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या होत्या. त्यानुसार मुख्यमंत्री स्वतः लोहारी सावंगा येथे रामभाऊ बालपांडे यांच्या घरी मुक्कामी राहिले आणि त्यांच्यासोबत भोजनही केले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही नंदुजी लोहे या शेतकऱ्याच्या घरी मुक्काम केला.

मुख्यमंत्र्यांचा हा दौरा केवळ सणाच्या शुभेच्छांपुरता मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेणारा ठरतो का, याकडे आता शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे. शेतीचे नुकसान, सिंचनाची समस्या आणि आर्थिक अडचणींवर सरकारकडून कोणता दिलासा मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यातील गोशाळांना सरसकट अनुदान द्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यातील गोशाळांमधील पशुधनाच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला असून, शासनाने प्रत्येक पशुसाठी प्रतिदिन १०० रुपये अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी गोशाळा महासंघाच्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात जिल्ह्यातील गोशाळा संचालक आणि पशुपालकांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. राज्यात नोंदणीकृत १ हजार १४ गोशाळा आहेत त्यांना सरसकट अनुदान देण्याची मागणी करण्यात आली.

औषधी इंजेक्शनच्या बेकायदेशीर विक्रीचा पर्दाफाश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : दिवाळीचा आनंद सर्वत्र साजरा होत असतानाच, बारामती शहर पोलिसांनी एक मोठी कारवाई करत औषधी इंजेक्शनच्या संशयित बेकायदेशीर विक्रीचा पर्दाफाश केला आहे. बारामती शहरातील इंदापूर रोडवरील मार्केट यार्ड परिसरात पोलिसांनी अचानक छापा टाकत प्रतिबंधित आणि संशयित औषधाचा मोठा साठा जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी संशयास्पद हालचाली करणाऱ्या चार जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडील दोन मोटारसायकल आणि औषधांचा साठा जप्त करण्यात आला आहे.

भरधाव कारने चिरडले...

■ दोघा भावंडांसह चिमुकल्या नातीचा जागीच मृत्यू
■ अहिल्यानगर – सोलापूर महामार्गावर बाभूळगाव खालसा शिवारात भीषण अपघात



महामार्गावर रक्ताचा सडा
रिक्षाच्या पाठीमागून हे तिघेही दुचाकीवरून बांभूळगाव फाट्याजवळ पोहोचले असता, सोलापूर महामार्गावरून सुसाट आणि बेदरकार वेगाने येणाऱ्या एका चारचाकी कारने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि तिघेही लांब उडून डांबरी रस्त्यावर आदळले. गंभीर मार लागून आणि अतिरक्तस्रावामुळे सुदाम पडोळे, देवीदास पडोळे आणि निष्पाप चिमुकली श्रेया या तिघांचाही जागीच तडफडून मृत्यू झाला.

नातीसाठी नवे कपडे घेण्याचे स्वप्न अधुरेच !
हट्टासाठी निघाली अन् आजोबा, मला दिवाळीला नवे कपडे आणि फटाके हवेत, असा बालसुलभ हट्ट श्रेयाने धरला होता. शेतातील कापूस विकून येणाऱ्या पैशांतून तिच्या हातावर नवे कपडे ठेवण्याचा आनंद आजोबांना मिळणार होता. मात्र नियतीला हे मान्य नव्हते. एका क्षणात या चिमुरडीचा जीव गेल्याने संपूर्ण पंचक्रोशी हळहळ व्यक्त करत आहे.

अनाथ झालेल्या चिमुकलीवरही काळाचा घाला
पितृछत्र आधीच हरवले होते: सुदाम पडोळे यांचा मुलगा विशाल याचे काही वर्षांपूर्वीच अकाली निधन झाले होते. त्यामुळे विशालची एकुलती एक मुलगी असलेली श्रेया पूर्णपणे अनाथ झाली होती. आजोबा सुदाम हेच तिचा संपूर्ण सांभाळ करत होते.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मिरजगाव : अहिल्यानगर सोलापूर महामार्गावर कर्जत तालुक्यातील बाभूळगाव खालसा गावच्या शिवारात भरधाव कारने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथील पडोळे कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना शनिवारी, दि.७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. सुदाम मारुती पडोळे (वय ५५) देविदास मारुती पडोळे (वय ५५) आणि श्रेया विशाल पडोळे (वय १०, सर्व रा. केळसांगवी, ता. आष्टी, जि. बीड) अशी या अपघातातील मृतांची नावे आहेत.

या अपघाताची सविस्तर माहिती अशी की, मच्छिंद्र सुभाष कदम (वय ४२, रा. तांबवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर) हा मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार अहिल्यानगरकडून सोलापूरच्या दिशेने भरधाव वेगाने चालवत होता. या भरधाव कारने कर्जत तालुक्यातील बाभूळगाव खालसा शिवारात सुदाम पडोळे यांच्या हिरो होंडा पॅशन प्रो दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात मोटर सायकल वरील तिघेजण गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी गणेश शिवाजी पडोळे यांच्या फिर्यादीवरून मिरजगाव पोलीस ठाण्यात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केळसांगवी येथील शेतकरी सुदाम मारुती पडोळे आणि देवीदास मारुती पडोळे यांनी दुष्काळी परिस्थितीत शेतातून हाताशी आलेला थोडाफार कापूस दिवाळीच्या खर्चासाठी विक्री करण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी कापसाच्या गाठी एका मालवाहू रिक्षात भरून विक्रीसाठी मिरजगावकडे रवाना केल्या. त्यानंतर दिवाळीच्या खरेदीसाठी सुदाम पडोळे हे आपली १० वर्षांची नात श्रेया हिला नवीन कपडे आणि फटाके घेऊन देण्यासाठी दुचाकीवर बसवून निघाले. त्यांच्यासोबत चुलत आजोबा देवीदास पडोळे हेदेखील दुचाकीवर स्वार झाले होते.

दिवाळी सणाचा आनंद, नातीच्या चेहऱ्यावरील गोड हसू आणि शेतातील घामाचे चीज करून मिळणाऱ्या पैशातून सण साजरा करण्याचे एका शेतकरी कुटुंबाचे स्वप्न या अपघातामुळे क्षणातच धुळीस मिळाले आहे.

अहिल्यानगर-सोलापूर महामार्गावरील बाभूळगाव (मिरजगावजवळ) शिवारात शनिवारी रात्री ७ वा.च्या सुमारास घडलेल्या भीषण आणि काळीज पिळवटून टाकणाऱ्या अपघातात भरधाव कारने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक देऊन चिरडल्याने दोन शेतकरी भावांसह त्यांच्या १० वर्षांच्या चिमुकल्या नातीचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. ऐन दिवाळीत एकाच कुटुंबातील तिघांवर काळाने झडप घातल्याने केळसांगवी सह बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. या अपघाताबाबतचा अधिक तपास मिरजगाव पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक डी. एस. कासार करत आहेत.

अमेरिकेत हिंदू द्वेषाचा विखारी चेहरा!

'भारतीयांना देशाबाहेर हाकला'चे फलक झळकले, लहान मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात द्वेषाचे प्रदर्शन

सिएटलमध्ये दिवाळीच्या कार्यक्रमात ट्रम्प समर्थकांची घुसखोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सिएटल (अमेरिका) : भारतातून हजारो मैल दूर अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांच्या कष्ट, कर्तृत्व आणि सांस्कृतिक योगदानाचा जगभर गौरव होत असताना, दुसरीकडे भारतीय आणि हिंदू समाजाविरोधातील द्वेषाचे विषही पसरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अमेरिकेतील सिएटल शहरात दिवाळीनिमित्त आयोजित भारतीयांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात ट्रम्प समर्थकांनी घुसखोरी करत भारतीय आणि हिंदू समाजाविरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी केली. विशेष म्हणजे, लहान मुले व्यासपीठावर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत असतानाच आंदोलकांनी 'सर्व भारतीयांना अमेरिकेतून हाकलून द्या' आणि 'हिंदू ख्रिश्चनांची जागा घेत आहेत', अशा आशयाचे फलक झळकावले. या प्रकारामुळे कार्यक्रमस्थळी संतापाची लाट उसळली. उपस्थित भारतीयांनी एकजूट दाखवत आंदोलकांचा निषेध केला आणि त्यांना कार्यक्रमस्थळावरून बाहेर काढले.

अमेरिकेत भारतीय वंशाच्या नागरिकांनी राजकारण, उद्योग, शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत मोठे स्थान निर्माण केले आहे. मात्र, या यशस्वी वाटचालीला आता वंशद्वेष आणि धार्मिक विद्वेषाचे ग्रहण लागण्याची चिन्हे दिसत आहेत. सिएटलमधील घटना ही केवळ एका सांस्कृतिक कार्यक्रमातील घोषणाबाजी नसून, अमेरिकेतील स्थलांतरितांविरोधातील वाढत्या



आक्रमक मानसिकतेचेही प्रतिबिंब मानले जात आहे.

या आंदोलनात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा समर्थक असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या जॅक लॅंग याची ओळख समोर आली आहे. अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकीत ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला बसलेल्या राजकीय धक्क्यामागे भारतीयांचा हात असल्याचा आरोप काही ट्रम्प समर्थकांकडून केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर हिंदू आणि भारतीय समाजाला लक्ष्य करण्यात आल्याचे चित्र आहे. कार्यक्रमातून बाहेर काढल्यानंतरही लॅंगने हिंदूंनाच दोष देण्याची भूमिका घेतली. टेक्सासमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाला विजय मिळवून देण्यासाठी हिंदूंनी मदत केल्याचा आरोप त्याने केला.इतकेच नव्हे, तर लॅंगने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत दिवाळीच्या कार्यक्रमात आपल्यावर आणि आपल्या सहकाऱ्यांवर अँटिफा कार्यकर्ते व हिंदूंच्या जमावाने हल्ला केल्याचा दावा केला.

सणाच्या आनंदात द्वेषाची घुसखोरी!
दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि बंधुभावाचा उत्सव. मात्र, याच सणाच्या कार्यक्रमात भारतीयांना देशाबाहेर हाकलण्याच्या घोषणा होणे, हा अमेरिकेतील बहुसांस्कृतिक समाजव्यवस्थेसमोर उभा राहिलेला गंभीर प्रश्न आहे. धार्मिक स्वातंत्र्य, समानता आणि लोकशाही मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिकेत भारतीय समाजाला आपले सणही निर्भयपणे साजरे करता येणार नाहीत का, असा सवाल या घटनेने उपस्थित केला आहे. राजकीय मतभेदांच्या नावाखाली एखाद्या धर्माला किंवा स्थलांतरित समुदायाला लक्ष्य करण्याची प्रवृत्ती वाढत असेल, तर ती केवळ भारतीयांसाठीच नव्हे, तर अमेरिकेच्या लोकशाही मूल्यांसाठीही चिंतेची बाब ठरते.

दुष्काळात पशुधन जगविण्यासाठी बळीराजाची धडपड

अडीच लाखांहून अधिक पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर; गोठा वाचविण्यासाठी कसरत

शशिकांत पवार ।
राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : भीषण दुष्काळाने शेतीच उद्ध्वस्त केली नाही तर बळीराजाच्या गोठ्यातील पशुधनाच्या जगण्याचाही प्रश्न निर्माण केला आहे. कधीकाळी हिरव्यागार पिकांनी डोलणारी शेतशिवारं, पाण्याने भरलेले तलाव आणि डोंगररांगांमध्ये मुक्तपणे बागडणारे वन्यप्राणी... याच दिवसांमध्ये आता सर्वत्र उजाड माळरान, कोरडी जमीन आणि पाण्यासाठी सुरू असलेली भटकंती पाहायला मिळत आहे. अशा भीषण परिस्थितीत आपल्या गोठ्यातील मुक्या जनावरांना जगविण्यासाठी बळीराजाची मोठी धावपळ सुरू झाली आहे.

नगर तालुक्यातील अडीच लाखांहून अधिक पशुधनाच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. विहिरींनी तळ गाठला, तलाव कोरडे पडले, शेतातील हिरवा चारा संपला आणि उपलब्ध चाऱ्याचे दरही वाढू लागले आहेत. परिणामी जनावरांचे पोट कसे भरायचे, त्यांना पाणी कुठून आणायचे आणि पुढील काही महिने त्यांची व्यवस्था कशी करायची, या विवंचनेत पशुपालक शेतकरी सापडला आहे.

शेतीतून उत्पन्न मिळण्याची आशा मावळली असली तरी गोठ्यातील जनावरे जगविण्याची आशा बळीराजाने सोडलेली नाही. शेतात शिल्लक राहिलेले बाजरीचे सरमाड, मका, वाढे यांचा मुरघास बनवून शेतकरी आगामी काही दिवस चाऱ्याचा प्रश्न मिटविण्याचा केविलवाना प्रयत्न करत आहे. सोयाबीनचा गवंडा गोळा करून ठेवण्याची लगबग सुरू आहे.

मुरघास तयार करण्यासाठी शेतकरी मिळेल त्या ठिकाणाहून हिरवा चारा, मक्याचे वाढे आणि इतर उपलब्ध वैरण जमा करत आहेत. काही ठिकाणी चारा कापणे, त्याची कुट्टी करणे आणि योग्य पद्धतीने साठवणूक करणे यासाठी कुटुंबातील सर्व सदस्य हातभार लावत आहेत. आज मिळणारा थोडासा चारा उद्याच्या संकटात उपयोगी पडेल या आशेने प्रत्येक शेतकरी धडपडताना दिसत आहे.

ज्या पशुधनाच्या भरवशावर शेतकऱ्याचा संसार चालतो शेतीला बळ मिळते आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र फिरते त्याच पशुधनाला आज जगविण्यासाठी बळीराजाला संघर्ष करावा लागत आहे. अपुऱ्या चारा-पाण्यामुळे जनावरांची प्रकृती खालावताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. गोठ्यातील जनावरांच्या अवस्थेकडे पाहून शेतकऱ्याचे काळीज हेलावते. मात्र स्वतःच्या पोटापेक्षाही मुक्या जनावरांच्या चारा-पाण्याची चिंता त्याला अधिक सतावत आहे.

शेतीचे नुकसान, दुसरीकडे पाण्यासाठी टँकरवर अवलंबित्व आणि आता पशुधनाच्या चाऱ्याची चिंता अशा तिहेरी संकटात बळीराजा सापडला आहे. पावसाळ्यात हिरवागार दिसणारा निसर्ग यंदा दुष्काळाच्या झळांनी होरपळून निघाला आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या परीने चारा साठविण्याचे प्रयत्न सुरू केले असले तरी एवढ्या मोठ्या पशुधनाची गरज भागविणे एकट्या शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेर जात आहे. त्यामुळे शासनाने चारा डेपो, पशुधनासाठी पाणीपुरवठा आणि आवश्यक मदत याबाबत तातडीने उपाययोजना करण्याची अपेक्षा पशुपालक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. बहुतांश मुरघासासाठी उपलब्ध चारा हा दुसऱ्या तालुक्यातून आणावा लागत आहे त्याचा खर्चही मोठा होत आहे.

स्वतःच्या घासापेक्षा जनावरांच्या चाऱ्याची चिंता !

दुष्काळाने शेती उद्ध्वस्त केली हाताला काम उरले नाही आणि घरात आर्थिक चणचण निर्माण झाली. तरीही बळीराजा आपल्या गोठ्यातील मुक्या जनावरांना जगविण्यासाठी धडपडत आहे. स्वतःच्या पोटाची चिंता बाजूला ठेवून बाजरीचे सरमाड, मका,उसाचे वाढे यांचा मुरघास तर सोयाबीनचा भुसा साठविण्याची लगबग सुरू आहे. मुक्या जीवांचे हाल पाहण्यापेक्षा मिळेल त्या चाऱ्याची तजवीज करण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे.



अडीच लाख पशुधनाच्या जगण्याचा प्रश्न ऐरणीवर !

नगर तालुक्यातील अडीच लाखांहून अधिक पशुधनाला दुष्काळाच्या झळा बसत आहेत. कोरडे पडलेले तलाव, तळ गाठलेल्या विहिरी आणि संपत चाललेला चारा यामुळे पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. शेतकरी स्वखर्चाने मुरघास तयार करून चारा साठविण्याचा प्रयत्न करत असले, तरी एवढ्या मोठ्या पशुधनाची गरज भागविणे कठीण बनले आहे. शासनाने चारा डेपो आणि पाणीपुरवठ्याबाबत तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

श्री स्वामी समर्थ देवस्थानासाठी भव्य महारथ संकल्प

डॉ. निवृत्ती पाणमंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : एक संकल्प... एक श्रद्धा... एकजूट सेवेकऱ्यांची आणि स्वामींच्या चरणी समर्पित एक भव्य दिव्य कार्य या भावनेतून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेने देवस्थानासाठी एका भव्य दिव्य महारथाची निर्मिती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या ऐतिहासिक व पवित्र कार्याची जबाबदारी सर्वानुमते निश्चित करण्यात आली असून, ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. निवृत्ती पाणमंद (निघोज) यांच्या अध्यक्षतेखाली महारथ निर्माण समितीची स्थापना करण्यात आली आहे.



देवस्थानचे संस्थापक अनिल आवारी, अध्यक्ष सुभाष भोसले, उपाध्यक्ष किसन चौधरी यांच्यासह देवस्थानच्या सर्व विश्वस्त, पदाधिकारी आणि सेवेकऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या कार्यावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. हा महारथ केवळ एक लाकडी अथवा धातूची रचना नसून, संपूर्ण पंचक्रोशीतील स्वामी भक्तांच्या श्रद्धेचे, समर्पणाचे आणि सामूहिक भक्तीचे मूर्तिमंत रूप ठरणार आहे.

या निर्मिती प्रक्रियेत आर्थिक सहकार्य, वास्तुशिल्प नियोजन, जनसंपर्क आणि श्रमदान अशा प्रत्येक पातळीवर सर्व सेवेकऱ्यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. हे कार्य कोणा एका घटकाचे नसून संपूर्ण स्वामी परिवाराचे आहे, अशी भावना बैठकीत व्यक्त करण्यात आली.

लवकरच काम पूर्ण होऊन हा महारथ देवस्थानच्या प्रांगणात दाखल होईल. हा सोहळा देवस्थानच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदवला जाईल. त्यामुळे सर्व भाविक आणि सेवेकऱ्यांनी हे देवकार्य स्वतःचे मानून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नवनिर्वाचित समिती व देवस्थान पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्यार्थी व प्राध्यापकांच्या आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचा मार्ग मोकळा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे (ता. जुन्नर, जि. पुणे) आणि फिलिपिन्स देशातील कॅटबालोगन सिटी कम्युनिटी कॉलेज यांच्यामध्ये नुकताच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य करारावर फिलिपिन्स येथील कॅटबालोगन सिटी कम्युनिटी कॉलेज चे अध्यक्ष डॉ. निगेल एल कॉर्नजो आणि समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य प्रा.डॉ.नवनाथ नरवडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी युवा शास्त्रज्ञ डॉ प्रतीक मुणगेकर, प्रा. रतिलाल बाबेल, प्रा. तानाजी वामन,समर्थ कॉलेजचे प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदिप गाडेकर तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.सचिन पोखरकर उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारामुळे दोन्ही शैक्षणिक संस्थांमधील शैक्षणिक सहकार्य अधिक दृढ होणार असून विद्यार्थी व प्राध्यापकांची आंतरराष्ट्रीय स्तरावर देवाणघेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प, शैक्षणिक संसाधनांची उपलब्धता आणि ज्ञानाची देवाणघेवाण यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार आहे. या करारांतर्गत दोन्ही संस्थांमधील प्राध्यापकांना अल्पकालीन अध्यापनासाठी संधी उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांसाठी सेमिस्टर किंवा शैक्षणिक वर्षाच्या कालावधीतील विद्यार्थी विनिमय कार्यक्रम राबविणे, संयुक्त संशोधन प्रकल्पांना चालना देणे, संशोधन निष्कर्षांची देवाणघेवाण करणे तसेच आंतरराष्ट्रीय परिषद, कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजन करणे यावर भर देण्यात येणार आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण, इंटर्नशिप, औद्योगिक भेटी, व्यावसायिक कौशल्य विकास कार्यक्रम आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे. दोन्ही संस्थांमधील शैक्षणिक जर्नल्स, संशोधन प्रकाशने,अध्यापन साहित्य आणि इतर शैक्षणिक साधनसामग्रीची देवाणघेवाण करण्यासाठीही सहकार्य केले जाणार आहे.

१५ टक्के लाभांशातून सभासदांना ६६ लाखांची दिवाळी भेट

अवघ्या १० मिनिटांत सोनेतारण कर्जाची सुविधा सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

बेलवंडी : सभासदांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि नियोजनबद्ध आर्थिक व्यवस्थापनाच्या बळावर बेलवंडी येथील व्यापारी पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर संस्थेने सभासदांना १५ टक्के दराने तब्बल ६६ लाख ४० हजार रुपयांच्या लाभांशाचे वाटप करून आनंदाची भेट दिली. असल्याचे प्रतिपादन पतसंस्थेचे चेअरमन उत्तम डाके यांनी केले.

त्याचबरोबर अवघ्या दहा मिनिटांत सोनेतारण कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या नवीन सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमांमुळे संस्थेच्या सभासदाभिमुख कार्याचा प्रत्यय आला.

व्यापारी पतसंस्थेच्या वतीने लाभांश वाटप, सभासद प्रशिक्षण आणि नवीन सोनेतारण कर्ज सुविधा शुभारंभाचा संयुक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे चेअरमन उत्तम डाके यांनी अध्यक्षीय भाषणातून संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला.



कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सभासदांना १५ टक्के दराने ६६ लाख ४० हजार रुपयांच्या लाभांशाचे वाटप करण्यात आले. याशिवाय संस्थेच्या नवीन सोनेतारण कर्ज सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. सोन्याची शुद्धता तपासण्यासाठी अत्याधुनिक डिजिटल मशीन उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यामुळे पारदर्शक व अचूक मूल्यांकनासह सभासदांना अवघ्या दहा मिनिटांत सोनेतारण कर्ज मिळण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लोकनियुक्त सरपंच ऋषिकेश शेलार, बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, सहाय्यक निबंधक रावसाहेब खेडकर, श्रीगोंदा कारखान्याचे माजी उपाध्यक्ष माऊली हिरवे, भैरवनाथ सेवा सोसायटीचे माजी अध्यक्ष दिनेश इथापे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष सुभाषराव काळाणे, ज्येष्ठ नेते विलासराव राजेभोसले, चेअरमन विजय काळाणे, उपाध्यक्ष अर्जुन हिवरकर, मार्गदर्शक संचालक सोपान हिरवे, युवराज पवार, उद्योजक मोहन आढाव, सहाय्यक अधिकारी भाऊसाहेब सिनारे, उपसरपंच बाळासाहेब ढवळे, वसुली अधिकारी दत्तात्रय हांडे, इंद्रायणी पतसंस्थेचे सचिव सोपानराव लोंढे, अग्निपंख फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब काकडे, लेखापरीक्षक अंकुश गुंजाळ, विमा सल्लागार नंदकुमार सुपेकर, अभियंता अर्जुन कोळसे, केशव कातोरे आदी उपस्थित होते.

तसेच बेलवंडी ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, भैरवनाथ सेवा सोसायटीचे आजी-माजी पदाधिकारी, विविध पतसंस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव किसन वऱ्हाडे यांनी केले.

४६ वर्षांची परंपरा... निंबळकच्या मैदानावर क्रिकेटचा महासंग्राम!

आजपासून दिवाळी लेदर बॉल स्पर्धेचा थरार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : दिवाळीचा उत्साह, क्रिकेटचा जल्लोष आणि मैदानावर विजयासाठी रंगणारी चुरस... अशा उत्साही वातावरणात निंबळक येथे सोमवार (दि. ९) पासून भव्य दिवाळी लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचा महासंग्राम रंगणार आहे. तब्बल ४६ वर्षांची अखंड परंपरा जपणाऱ्या या स्पर्धेने ग्रामीण भागातील क्रिकेटप्रेमींच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. स्व. संजय लामखडे व स्व. विलासराव लामखडे स्मृती चषक २०२६-२७ या स्पर्धेचे आयोजन दोस्ती कला-क्रीडा व सांस्कृतिक मंडळ (ट्रस्ट), निंबळक यांच्या वतीने करण्यात आले आहे.



निंबळक येथील ग्रीनहिल स्टेडियमवर होणाऱ्या या स्पर्धेत चौकार-षटकारांची आतषबाजी, गोलंदाजांचा भेदक मारा आणि क्षेत्ररक्षकांची चपळाई पाहण्याची संधी क्रीडाप्रेमींना मिळणार आहे. ग्रामीण भागातील नवोदित आणि अनुभवी खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी ही स्पर्धा महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे. चार दशकांहून अधिक काळ ही परंपरा अखंड सुरू राहणे हे या स्पर्धेच्या लोकप्रियतेचे वैशिष्ट्य मानले जाते.

सोमवारी होणाऱ्या उद्घाटन समारंभास खासदार तथा जिल्हा बँकेचे संचालक नीलेश लंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे आणि सरपंच तथा प्रशासक प्रियंका अजय लामखडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धेतील विजेत्या संघांसाठी मोठ्या रकमेची पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी ६६ हजार ६६६ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ४४ हजार ४४४ रुपये, तृतीय क्रमांकासाठी ३३ हजार ३३३ रुपये, तर चतुर्थ क्रमांकासाठी २२ हजार २२२ रुपये आणि आकर्षक चषक देण्यात येणार आहे.

याशिवाय मॅन ऑफ द सिरीज, बेस्ट बॅट्समन, बेस्ट बॉलर आणि बेस्ट फिल्डर या वैयक्तिक पुरस्कारांसाठी प्रत्येकी १ हजार १११ रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे.

४६ वर्षांपासून सुरू असलेली ही स्पर्धा केवळ क्रिकेट सामने न राहता निंबळकच्या क्रीडा संस्कृतीचा अभिमान बनली आहे. अनेक खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखविण्याची संधी या स्पर्धेने उपलब्ध करून दिली आहे. यंदाही जिल्ह्यातील क्रिकेट संघांमध्ये चुरशीचे सामने रंगण्याची अपेक्षा असून, क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पारनेर तालुक्यातील बहुसंख्य गावात कुकडीचे पाणी

मदगे यांनी मानले ना. विखे पाटील व आ. दाते यांचे आभार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : पारनेर तालुक्यातील कुकडी डावा कालवा व कुकडी नदीच्या लाभक्षेत्रातील गावांना पाणी पोहोचले असून जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार काशिनाथ दाते सर यांनी पाणी सोडण्यासाठी आग्रही भूमिका घेऊन चांगले काम केले असून त्याबद्दल कृषीगंगा पाणी वापर संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव मदगे व सर्व पाणी वापर संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी आभार व्यक्त करीत धन्यवाद मानले आहेत. याबाबत बोलताना चेअरमन दिलीप मदगे यांनी सांगितले की या पाण्याच्या रोटेशनची अत्यंत गरज होती. त्याप्रमाणे आमदार दाते सर यांनी पाठपुरावा केला तसेच नामदार विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुण पाणी सोडण्याची सुचना कुकडी कालवा सल्लागार समितीमध्ये केल्याने पाण्याचा प्रश्न सुटला आहे.



लाभधारक गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. तसेच जनावरांसाठी हिरवा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला होता या रोटेशनने जवळा, गुणोरे, शिनगरवाडी, म्हसे खुर्द, म्हसे बुद्रुक या गावातील पाण्याचा प्रश्न सुटला असून ऐन दिवाळीत शेतकऱ्यांना व जनतेला मंत्री महोदय व आमदार यांनी आनंदी भेट दिल्याची माहिती चेअरमन मदगे यांनी दिली आहे. पाटबंधारे अधिकारी व कर्मचारी यांनी सुद्धा शेतकऱ्यांना कायमस्वरूपी सहकार्य केले असून शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त पाण्याची मागणी करुण पाणीपट्टी थकबाकी न ठेवता ती भरुण सहकार्य करण्याचे आवाहन पाणी वापर संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी केले आहे.

काष्टीत कत्तलीसाठी डांबलेल्या ६२ गोवंशीय जनावरांची सुटका!

स्थानिक गुन्हे शाखेचा छापा; २८ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे कत्तलीच्या उद्देशाने दोन वेगवेगळ्या ठिकाणी डांबून ठेवलेल्या तब्बल ६२ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून सुटका केली. या कारवाईत २८ लाख ६० हजार रुपये किमतीची जनावरे आणि तीन चारचाकी वाहने असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी दौंड येथील फैजान उर्फ अबुझर अब्दुलहक कुरेशी याच्याविरुद्ध श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कारवाईचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक अवैध व्यवसायांची माहिती घेत असताना ८ नोव्हेंबर रोजी काष्टी परिसरात गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बांधून ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली.

काष्टी-दौंड महामार्गालगत संदीप पाचपुते यांच्या गोठ्याजवळ तसेच नवीन पेट्रोल पंपाच्या बांधकामाच्या वॉल कंपाऊंडच्या मागील बाजूस जनावरे डांबून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीगोंदा पोलिसांच्या मदतीने पंचांसमक्ष दोन्ही ठिकाणी छापा टाकला. यावेळी लहान-मोठ्या गायी, गोऱ्हे आणि कालवडी अशी एकूण ६२ गोवंशीय जनावरे बांधून ठेवल्याचे आढळून आले.



पोलिसांनी जनावरांच्या मालकीबाबत चौकशी केली असता ती फैजान उर्फ अबुझर कुरेशी याच्या मालकीची असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी ६२ जनावरे आणि तीन चारचाकी वाहने असा एकूण २८ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १००७/२०२६ अन्वये महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) मधील कलम ५(अ), ५(ब), ९ तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबतच्या कायद्यातील कलम ३ व ११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक विकास जाधव व त्यांच्या पथकाने श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने केली.

द•ख•ल



उंदीरगाव ग्रामपंचातकडून वार्ड क्र ४ भागात दिवाळीत स्ट्रीट लाईट नाही

शिरसगाव : श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथी नावाजलेली ग्रामपंचायत असून सर्व प्रभागात स्ट्रीट लाईट चालू असून ऐन दिवाळीत प्रभाग ४ मध्ये साधे चार स्ट्रीट लाईट नसल्याने तेथील ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली जात आहे राऊत यांच्या दुकानापासून लाईट नाहीत ग्रापंचायतीकडून या प्रभागाचा विकास होत नसेल तर दिवाळीच्या पाडव्याला राजीनामा द्यावा अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे अशा अनेक समस्या नेहमी उभ्या असतात.सध्या अस्वच्छतेचा गंभीर प्रश्न पडला आहे.गावात ठिकठिकाणी कचरा,प्लॅस्टिकच्या बाटल्या अस्ताव्यस्थ पडलेल्या आहेत गावातील कचरागाडी बंद पडली आहे. सार्वजनिक निधितून घेतलेली घंटागाडी उपलब्ध असून तिचा वापर होत नाही.नागरिक उघड्यावरच कॅरीबॅग,बाटल्या जाळीत आहेत.त्यामुळे विषारी वायूचे प्रदूषण होत असते.गावात ठिकठिकाणी पाणी साचते गटारी होतात.त्यामुळे डासांची उत्पत्ती होते रोगराईला आमंत्रण मिळते. ग्रामपंचायत कार्यालयाकडून स्वच्छतेचे नियोजन होणे गरजेचे आहे.अशा अनेक समस्या गावात आहेत त्याकडे ग्रामपंचाय सदस्यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.असे नागरिकांना वाटते.

सहकाराच्या समृद्धीचा संकल्प; विखे कारखान्यात लक्ष्मीपूजनाचा मंगल सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : दीपावलीच्या मंगल पर्वानिमित्त पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या मुख्य कार्यालयात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात लक्ष्मीपूजन सोहळा पार पडला. कारखान्याचे व्हाईस चेअरमन सोपानराव शिरसाठ यांच्या हस्ते विधिवत लक्ष्मीपूजन करण्यात आले. यावेळी जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कारखान्याच्या सर्व संचालक मंडळासह अधिकारी, पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कारखान्याच्या प्रगतीमध्ये प्रत्येक संचालक, अधिकारी आणि कर्मचाऱ्याचे योगदान मोलाचे असून, सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतूनच संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

वर्षभर सर्वजण एकजुटीने आणि समर्पित भावनेने काम करीत असल्यामुळे कारखान्याची प्रगती अधिक वेगाने होत आहे. सहकारातील ही एकजूट आणि परस्परांचे सहकार्य यापुढेही कायम राहावे. येणारे नवीन वर्ष सर्वांच्या जीवनात सुख, समाधान, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो, तसेच कारखान्याची उत्तरोत्तर भरभराट होवो, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील, सर्व संचालक मंडळ, अधिकारी, पदाधिकारी आणि कर्मचारी



उपस्थित होते. लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने सहकार, श्रमप्रतिष्ठा आणि सामूहिक प्रगतीचा संदेश या सोहळ्यातून अधोरेखित झाला.

आजच्या शेतकरी रास्तारोको आंदोलनाला मराठा एकीकरण समितीचा पाठिंबा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : उसाला योग्य व न्याय्य भाव मिळण्यासाठी राहुरी येथे आज सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर आयोजित करण्यात आलेल्या बेमुदत रास्ता रोको आंदोलनाला मराठा बहुउद्देशीय संस्था संचलित मराठा एकीकरण समिती, राहुरी तालुकाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.

याबाबत समितीचे राहुरी तालुका अध्यक्ष देवेंद्र एस. लांबे यांनी शिवसेना प्रणीत शेतकरी सेना राज्यउपाध्यक्ष रविंद्र मोरे यांना औपचारिक पाठिंबा पत्र दिले आहे. पत्रात नमूद केल्याप्रमाणे, कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या एकजुटीमुळेतेथे ऊसाला प्रतिटन ४,२०० रुपये एवढा दर मिळाला आहे. मग अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योग्य भाव का मिळू नये, असा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांनी रात्रंदिवस मेहनत करून पिकवलेल्या पिकाला योग्य मोबदला मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असल्याचे मराठा एकीकरण समितीने म्हटले आहे.

शेतकरी हा समाजाचा पाठीचा कणा असून त्यांच्या न्यायाच्या लढ्यात मराठा एकीकरण समिती सदैव खंबीरपणे पाठीशी उभी राहील, अशी ग्वाही पत्राद्वारे देण्यात आली आहे. तसेच तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या हक्काच्या मोबदल्यासाठी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मराठा एकीकरण समितीच्या वतीने संदीप गाडे, योगेश तनपुरे, सतीश घुले, जनार्दन म्हसे, विक्रम मोढे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

खंडाळ्यात उभ्या कपाशी पिकावर चोरट्यांचा डल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

खंडाळा : शेतातील पिकांची चोरी होण्याचे प्रकार वाढत असतानाच आता चोरट्यांनी थेट उभ्या कपाशी पिकावरच डल्ला मारला आहे. खंडाळा येथील शेतकरी ज्ञानदेव भीमराज सदाफळ यांच्या उक्कलगाव शिवारातील शेतातून चोरट्यांनी अंदाजे दहा क्विंटल कापूस चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

सदाफळ यांची उक्कलगाव येथील गट क्रमांक २४० मध्ये शेती असून त्यांनी दोन एकर क्षेत्रावर कपाशीची लागवड केली आहे. कपाशी वेचणीला आल्याने त्यांनी महिला मजुरांच्या माध्यमातून कापूस वेचणीचे काम सुरू केले होते. दिवसभराचे काम आटोपल्यानंतर ते घरी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता शेतात गेले असता काही अज्ञात व्यक्तींनी शेतातील कापूस वेचून चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

पाहणी केली असता अंदाजे दहा क्विंटल कापूस चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले.

याप्रकरणी सदाफळ यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पुढील तपास सुरू आहे.

वीटभट्टीवरील चिमुकल्यांसोबत लीनेस क्लबची दिवाळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : सणांचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या भावनेतून लीनेस क्लब ऑफ श्रीरामपूर मैथिलीच्या वतीने गोंधवणी येथील वीटभट्टीवरील कामगारांच्या मुलांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

महेश बोर्डे यांच्या वीटभट्टीवर हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी क्लबच्या अध्यक्ष ली. डॉ. मीनल फुलवर, सचिव ली. माधुरी सोनवणे, खजिनदार ली. श्रद्धा मिरीकर यांच्यासह वीटभट्टी कामगार महेश बोर्डे, भरत बोर्डे व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.



यावेळी डॉ. मीनल फुलवर म्हणाल्या की, सण-उत्सवांचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. वीटभट्टीवर कष्ट करणाऱ्या कामगारांच्या मुलांसोबत दिवाळी साजरी करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, ही समाधानाची बाब आहे. क्लबच्या माध्यमातून यापुढेही असे समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतील.

माधुरी सोनवणे यांनीही कामगारांच्या मुलांसोबत दिवाळी साजरी करण्याचा आनंद व्यक्त केला. गरजूंच्या जीवनात आनंद निर्माण करणे हीच खरी मानवी सेवा असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमातून लीनेस क्लबने सामाजिक बांधिलकी जपत माणुसकीचा संदेश दिला. या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

डिसेंबरची प्रतीक्षा नको; नोव्हेंबरमध्येच निळवंडेचे आवर्तन सोडा!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



प्रवरानगर : ऑक्टोबर महिन्यातील तीव्र उन्हामुळे पाणीटंचाईचे संकट गडद होत असतानाच जनावरांच्या चाऱ्याचा आणि रब्बी पिकांच्या सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्यातून औरंगपूर-गोरक्षवाडी परिसरासाठी नोव्हेंबर महिन्यातच सिंचन व पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडण्यात यावे, अशी आक्रमक मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. यासंदर्भात भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ऑक्टोबरमधील उन्हाच्या तीव्रतेमुळे परिसरातील पाण्याची उपलब्धता कमी होत असून, पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे संपूर्ण अर्थकारण शेती आणि पशुधनावर अवलंबून असल्याने पाण्याअभावी दोन्ही घटकांवर संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

निळवंडेच्या डाव्या कालव्याचे नोव्हेंबरमध्ये आवर्तन मिळाल्यास हाताशी आलेल्या रब्बी पिकांना जीवदान मिळेल. त्याचबरोबर चारा पिकांची लागवड आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही मार्गी लागण्यास मदत होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा न करता नोव्हेंबरमध्येच पाण्याचे रोटेशन सोडावे, अशी आग्रही भूमिका शेतकऱ्यांनी मांडली आहे. दरम्यान, नुकत्याच झालेल्या निळवंडे पाणीवाटप बैठकीत जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री यांच्या सूचनेनुसार डिसेंबर महिन्यात सिंचन आवर्तन देण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे. मात्र, सध्याची पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेता या नियोजनाचा पुनर्विचार करून नोव्हेंबरमध्येच आवर्तन देण्याचा सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पशुधनाचे संरक्षण, रब्बी पिकांची जोपासना आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी निळवंडेचे पाणी वेळेत मिळणे अत्यावश्यक असल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले आहे. यावेळी औरंगपूर जनसेवा मंडळाचे अध्यक्ष विजयराव डेंगळे पाटील, इंद्रभान तांबे, लक्ष्मण चोपडे, बाळासाहेब गिरी, किसन आरगडे, भाऊसाहेब वदक, सचिन तळोले, योगेश वदक, सुमित डेंगळे, अरुण वदक, योगेश चोपडे यांच्यासह जनसेवा मंडळाचे कार्यकर्ते आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चांदा ग्रामस्थांच्यावतीने कारभारी जावळे यांचा सन्मान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

चांदा : नुकत्याच झालेल्या अहिल्या नगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणूकीत माजी सभापती कारभारी जावळे निवडणूकीच्या रिंगणात होते व ते प्रचंड मताधिक्याने विजय झाले म्हणून त्यांचा सोमेश्वर पतसंस्थेच्या वतीने सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते पत संस्थेचे माजी उपाध्यक्ष डॉ. विनोद गुंदेचा, बाबुराव चौधरी, निवृत्ती भगत, शिवाजी चौधरी, यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला या प्रसंगी संचालक संदीप जावळे, गोरक्षनाथ दिवटे, सोमनाथ भालके, पत्रकार देविदास चौरे, पत्रकार अरुण सोनकर, अशोक हराळे, सुभेदार शेख,जिवण आढाव, बाळासाहेब जावळे,भाऊसाहेब चिंतामणी,संस्थेचे सचिव भगवान घागरे, आप्पासाहेब जावळे राजेंद्र बुधवंत, डी.डी. नागपुरे, एन.डी. दहातोंडे, मोरगव्हाणचे राजेंद्र सोनवणे, भीमराज सोनवणे, गोरक्षनाथ सोनवणे, विक्रम चौधरी, रामहरी सोनवणे, अर्जुन जाधव इत्यादी या वेळी उपस्थित होते. तसेच नागेबाबा पत संस्थेच्या वतीने त्यांचा पत संस्थेत सन्मान करण्यात आला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळासाहेब दहातोंडे, बाबुराव चौधरी, चांगदेव पुंड, निवृत्ती भगत, रमेश दहातोंडे, बाळासाहेब नागपुरे, नितीन दहातोंडे, लक्ष्मण जावळे, शिवाजी दहातोंडे, महादू थिटे, चांदा सोसायटीचे अध्यक्ष महेश दहातोंडे, उप अध्यक्ष कानिफ अडसूरे, सोमनाथ दहातोंडे, अरुण दहातोंडे, जगन्नाथ थिटे, नामदेव दहातोंडे, सुभाष कर्डीले, वसंतराव भगत, नामदेव धाडगे, सारंगधर दहातोंडे, शहारम थोरात, एडीसीसी बँकेचे सुधाकर दराडे, विराज बोरुडे, भारत शेंडगे संस्थेचे मुख्य सचिव प्रशांत पासलकर आदी उपस्थित होते शेवटी नितीन दहातोंडे यांनी आभार मानले .

CHANGE OF NAME

MY OLD NAME AS FARUQUE AZAM ABDUL SHAIKH
MY NEW NAME AS FARUQUE AZAM ABDUL KARIM SHAIKH
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC JAMKHED

दुष्काळाच्या झळांतही कामगारांच्या चेहऱ्यावर फुलविला आनंदाचा दीप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नेवासा : राज्यभरात दुष्काळी परिस्थितीचे सावट, वाढती महागाई आणि आर्थिक आव्हानांचा सामना सुरू असतानाही आपल्या कर्मचाऱ्यांच्या घरात दिवाळीचा आनंद फुलावा, त्यांच्या कष्टांना सन्मान मिळावा, या उदात्त भावनेतून भैरवनाथ सोलर एजन्सीचे संस्थापक इंजिनीयर शंकर खाटीक यांनी माणुसकीचा आदर्श घालून दिला आहे.

महाराष्ट्रभर कार्यरत असलेल्या आपल्या ६० ते ६५ कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देण्याचा निर्णय घेत त्यांनी व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक बांधिलकीचेही दर्शन घडविले आहे.

यावेळी माऊली महाराज हारदे, शंकर महाराज , ह भ प अशोक महाराज, आजिनाथ निकम, कंपनीचे संस्थापक खाटिक, आणि सर्व कर्मचारी, उपस्थित होते.

व्यवसाय उभा करणे, त्याचा विस्तार करणे आणि स्पर्धेच्या युगात स्वतःचे स्थान निर्माण करणे हे निश्चितच आव्हानात्मक असते. मात्र, या यशाच्या प्रवासात आपल्यासोबत घाम गाळणाऱ्या कामगारांना विसरायचे नाही, ही भूमिका शंकर खाटीक यांनी जपली आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांत सौरऊर्जेची कामे करताना कर्मचाऱ्यांनी दिलेले योगदान, घेतलेले कष्ट आणि कंपनीच्या प्रगतीसाठी केलेली मेहनत यांची जाणीव ठेवून त्यांनी दिवाळी बोनसची भेट दिली.

विशेष म्हणजे, सध्याच्या आर्थिक परिस्थितीत अनेक उद्योग आणि व्यावसायिक खर्चाचे गणित जुळविण्याच्या प्रयत्नात असताना कर्मचाऱ्यांच्या आनंदाला प्राधान्य देण्याचा त्यांचा निर्णय कौतुकास्पद ठरत आहे. कंपनीची प्रगती ही केवळ मालकाच्या प्रयत्नांतून होत नसून प्रत्येक कर्मचाऱ्याच्या घामाचा आणि समर्पणाचा त्यात मोठा वाटा असतो, याची जाणीव त्यांनी कृतीतून करून दिली आहे. कारण त्यांचे वडील हे देखील कामगार आणि शेतकरी होते शेतकऱ्यांना भरभरून दान द्यायला आवडते तो गुण शंकरराव खाटीक यांच्यामध्ये वडिलांकडून आलेला आहे।

'व्यवसायाची प्रगती महत्त्वाची आहेच; मात्र आपल्या घामाने कंपनीची प्रगती घडविणाऱ्या कामगारांच्या घरातही दिवाळीचा दिवा आनंदाने पेटला पाहिजे,' ही शंकर खाटीक यांची भावना त्यांच्या नेतृत्वातील संवेदनशीलता अधोरेखित करणारी आहे. इंजिनीयर म्हणून तांत्रिक ज्ञानाच्या जोरावर व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवून महाराष्ट्रभर विस्तार करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा मेहनत, जिद्द, संघर्ष आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिचय करून देणारा आहे. स्वतःच्या प्रगतीसोबत सहकाऱ्यांच्या कुटुंबातही आनंद निर्माण करण्याची वृत्ती हीच त्यांच्या व्यावसायिक यशाला माणुसकीची किनार देणारी ठरली आहे. भैरवनाथ सोलर एजन्सी अँड सर्व्हिसेसच्या या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. केवळ रोजगार देणारी नव्हे, तर कर्मचाऱ्यांच्या सुख-दुःखाची जाणीव ठेवणारी संस्था म्हणून भैरवनाथ सोलर एजन्सीची ओळख या उपक्रमातून अधिक ठळक झाली आहे. कामगारांच्या कष्टांचा सन्मान आणि त्यांच्या कुटुंबाच्या आनंदाची काळजी घेणारे शंकर खाटीक यांचे हे पाऊल खऱ्या अर्थाने उद्योगविश्वासमोर माणुसकीचा दीप प्रज्वलित करणारे आहे.

जाहीर नोटीस

श्रीरामपूर येथील मे. ज्युडि. मॅजि. साहेब (वर्ग १) यांच्या कोर्टात

जन्म मत्यू व विवाह नोंदणी

अर्जदार: हिरा अशोक आबुज
मा. निबंधक
जन्म, मृत्यु व विवाह नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी साहेब -- सा. वाले

ज्याअर्थी श्रीरामपूर न्यायालयात अर्जदाराने क्रि.चौ.अ.नं. ५६४/२०२६ चा अर्ज जन्म, मृत्यु कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांनी त्यांचा मुलगा सार्थक अशोक आबुज याचा जन्म दि.३१/१२/२०११ रोजी टाकळीभान येथे जगताप हॉस्पीटल येथे झालेला आहे अशी आशयाची जन्माची नोंद होवून तसा दाखला मिळवण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जदार यांनी दिलेल्या अर्जावर सा.वाले यांनी म्हणणे देणेकरीता नोटीस मिळालेपासून दि.०१/१२/२०२६ रोजी पर्यंत स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर होवून हरकती नोंद कराव्यात व योग्य मुदतीत कोणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे मागणीप्रमाणे त्वरित पुरावा घेवून अर्जदाराचा मुलगा सार्थक अशोक आबुज याचे जन्माच्या तारखेचा नोंदीचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराच्या हक्कात आदेश करील.

श्रीरामपूर दि. २९/१०/२०२६

आदेशावरून
सही/-
सहाय्यक अधीक्षक
फौजदारी न्यायालय, वर्ग १
श्रीरामपूर

शिक्का

जाहीर नोटीस

ने.ता.२८/११/२०२६

नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ यांचे न्यायालयात फौजदारी

चौकशी अर्ज नंबर २४४/२०२६

बिन ८
ॲड. ए.आर.पठाणे
दिनांक :- ४/११/२०२६
मोबा नं. ९८२२०५०९३७

अर्जदार :- शहेनाज बशीर शेख वय ४७,धंदा घरकाम लग्नानंतरचे नाव शहेनाज रफिक शेख .
रा. घोडेगांव ता.नेवासा जि.अ.नगर
सा.वाले :- मा.निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा मुख्याधिकारी नेवासा नगरपंचायत, नेवासा ता.नेवासा जि.अ.नगर

ज्याअर्थी नेवासा न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २४४ / २०२६ अर्जदार शहेनाज बशीर शेख वय ४७,धंदा घरकाम लग्नानंतरचे नाव शहेनाज रफिक शेख रा. घोडेगांव ता. नेवासा जि.अ.नगर यांनी जन्म / मृत्यु कायदा १९६९ कलम १३ अन्वये अर्जदार हिचा जन्म दि.०६/०५/१९७९ रोजी मौजे नेवासा खुर्द ता.नेवासा येथे जन्म झालेले आहे. अशी जन्माची नोंद नोंद होवून मृत्युचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून दिनांक २८/११/२०२६ रोजी किंवा ३० पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवून हरकती करावयात, योग्य मुदतीत कुणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचे जन्माचा तारखेचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील. नेवासा

दिनांक :- ४/११/२०२६
सही/-
तयार करणार

आदेशावरून
सही/-
सहा. अधीक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
नेवासा

शिक्का

दखल

वीज प्रकल्पाचा भीमाशंकर शी संबंध नाही

पुणे: टोरांटो कंपनीच्या वतीने उभारण्यात येणारा वीज प्रकल्प हा भीमाशंकर अभायरण्य क्षेत्रच्या बाहेर आहे त्यामुळे भीमाशंकर व परिसराची सुरू असणारी बदनामी थांबवावी असे आवाहन आज झालेल्या भीमाशंकर ग्रामस्थांच्या बैठकीत करण्यात आली

भीमाशंकर चे सरपंच दत्तात्रय हिले यांच्या आध्यक्षतेखाली ही बैठक झाली या बैठकीला ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते भीमाशंकर परीसरातील पर्यावरणाचे व वन्यजीवांचे रक्षण अनेक वर्षपासून ग्रामस्थ करत आहेत त्यासाठी वनविभागाला सुद्धा ग्रामस्थ सहकार्य करत असतात जगलतोडीला ग्रामस्थांचा पण विरोधच आहे पण या वीज प्रकल्पच्या निमित्ताने भीमाशंकर मधील वृक्षतोडी चा जो संदर्भ येत आहे तो चुकीचा आहे त्याचा भीमाशंकर च्या पर्यावरणाशी कुठलाही संबंध नाही असे आज बैठकीत स्पष्ट करण्यात आले कुभमेळाच्या निमित्ताने सध्या भीमाशंकर परिसरात जी विकासकामे होत आहेत त्यात कुठलीही पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी ग्रामस्थ व शासनाच्या वतीने घेण्यात येत आहे या बैठकीत झालेल्या ठरावांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय व सबंधित शासानाच्या विभागांना देण्यात येणार आहे असे दत्तात्रय हिले यांनी सांगितले.

ससून रुग्णालयाच्या शवागारातील कर्मचाऱ्यांविषयी कृतज्ञता

गणेश मंडळांचा उपक्रम : १२ कर्मचाऱ्यांचा पाच लाखांचा आरोग्य विमा

पुणे : दीपावली या प्रकाशोत्सवाचे निमित्त साधून एरंडवणे परिसरातील सात गणपती मंडळांतर्फे ससून रुग्णालयातील शवागाराम ध्ये मृतदेहांची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. शवागारातील १२ कर्मचाऱ्यांचा प्रत्येकी पाच लाख रुपयांचा आरोग्य विमा काढण्यात आला असून त्याचे प्रमाणपत्र या वेळी सुपूर्त करण्यात आले.

बाल तरुण मंडळ, श्री शनि मारुती बाल गणेश मंडळ, देशप्रेमी मित्र मंडळ, गणेश नगर मंडळ, ओंकार मित्र मंडळ, एरंडवणे नागरी सहकारी मंडळ, अष्टविनायक मित्र मंडळ यांनी एकत्रितरित्या आज (दि. ७) हा उपक्रम राबविला. ससून रुग्णालयात कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. डॉक्टर, कर्मचाऱ्यांचा फेटे बांधून सन्मान करण्यात आला तसेच फराळाचे वाटप करण्यात आले.


प्रसिद्ध मूर्तीकार विवेक खटावकर, भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई, अखिल मंडई मंडळाचे विश्वस्त विश्वास भोर तसेच न्यायवैद्यक व विषशास्त्र विभागाचे प्रमुख विजय जाधव, , डॉ. गणेश जगताप, डॉ. कृष्णा भोईर, डॉ. डॉलर सोनी उपस्थित होते. आयोजित केलेल्या कृतज्ञता सोहळ्याचे सचिन पवार पवार, वैभव दिघे, शुभम माताळे, केदार बलकवडे, समीर येनपुरे, विवेक कडू, सोमनाथ जाधव, मोनीश आरू, अनघा जगताप, पंकज पेंढारे, राज पेंढारे, शुभम पेंढारे, सुनील तेलंग, प्रवीण पेंढारे, पप्पू हुलगे यांनी संयोजन केले.

एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणाला सलाम

१८ हजारांची पर्स सुखरूप परत.

आळेफाटा : प्रवाशांची सेवा करताना माणुसकी आणि प्रामाणिकपणाचे दर्शन घडवणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांनी पुन्हा एकदा समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. कल्याण ते आळेफाटा प्रवासादरम्यान हरवलेली १८ हजार रुपये रोख रक्कम आणि म हत्त्वाची कागदपत्रे असलेली पर्स एसटी चालक व वाहक यांच्या प्रामाणिकपणामुळे मूळ मालक महिलेला सुखरूप परत मिळाली. या घटनेमुळे एसटी कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

इंदूबाई पिंगळे या आपल्या भावाच्या दहाव्याच्या कार्यक्रम ासाठी कल्याण-साकुरी मुक्कामी एसटी बसने प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान झालेल्या गडबडीत त्यांची पर्स बसमध्येच राहून गेली. घरी पोहोचल्यानंतर पर्स हरवल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी ही बाब आपली भाचे सून भक्ती बोडके यांना सांगितली. भक्ती यांनी तातडीने आपले दीर तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके यांना घटनेची माहिती दिली. कैलास बोडके यांनी आपले मित्र व आगारप्रमुख वसंत अरगडे यांच्याशी संपर्क साधून हरवलेल्या पर्सचा शोध घेण्याची विनंती केली. अरगडे यांनीही तत्परता दाखवत संबंधित बसच्या वाहकाचा मोबाईल क्रमांक मिळवून दिला. त्यानंतर बोडके यांनी वाहक संदीप भांगले यांच्याशी संपर्क साधला असता, बसमध्ये पर्स मिळाल्याची माहिती समोर आली.वाहक संदीप भांगले व चालक संभाजी दराडे यांनी पर्सची तपासणी केली असता, त्याम ध्ये १८ हजार रुपये रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे असल्याचे आढळले. कोणताही विलंब न करता त्यांनी पर्स सुरक्षित ठेवली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी परतीच्या प्रवासात इंदूबाई पिंगळे यांना त्यांची पर्स जशीच्या तशी सुपूर्द केली.



दुष्काळग्रस्त १० तालुक्यांत नरेगा अंतर्गत कामांना गती द्या-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : पुणे जिल्ह्यातील १० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी नरेगा अंतर्गत कामांना गती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील रोजगाराची वाढती मागणी लक्षात घेऊन संबंधित यंत्रणांनी तातडीने नियोजन करून कामे सुरू करावीत,रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करण्यावर भर द्यावा. 'ट्रिगर-१' आणि 'ट्रिगर-२' लागू झालेल्या तालुक्यांसह स्थानिक परिस्थितीनुसार प्रत्येक तालुक्याने स्वतंत्र नियोजन करावे. ग्रामपंचायत आणि तालुकानिहाय रोजगार मागणी, उपलब्ध कामे आणि मंजूर कामांचा आढावा घेऊन दैनंदिन उद्दिष्टांसह कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ग्रामीण भागातील वाढती रोजगार मागणी लक्षात घेऊन प्रशासकीय स्तरावर आवश्यक ती शिथिलता वापरावी. शेल्फवर उपलब्ध असलेल्या कामांमधून स्थानिक गरजेनुसार तातडीने कामे मंजूर करून सुरू करावीत. ग्रामसभा आणि ग्रामपंचायत स्तरावर मंजूर झालेल्या आराखड्यांचे तालुकास्तरावर एकत्रीकरण करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने जलसंधारणाची कामे प्राधान्याने हाती घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भूजल पुनर्भरण, तलावांमधील गाळ काढणे, तलावांचे पुनरुज्जीवन, समतल चर आणि जलप्रवाह उपचार यांसारखी कामे विविध योजनांच्या अभिसरणातून राबवावीत. कामांची निवड करताना दुबार निधी होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी.

मोठ्या आर्थिक तरतुदीची, कमी भौतिक प्रगती असलेल्या किंवा तक्रारी प्राप्त झालेल्या कामांची प्रत्यक्ष क्षेत्रीय तपासणी करण्यात यावी. मस्टर, मोजमाप पुस्तिका, छायाचित्रे, भौगोलिक नोंदी आणि बिले यांची प्रत्यक्ष कामाच्या स्थितीशी पडताळणी करण्यात यावी.

दर आठवड्याला कामांचा आढावा

दुष्काळ निवारणाच्या कामांचा प्रत्येक स्तरावर दर आठवड्याला आढावा घ्यावा. संबंधित अधिकाऱ्यांनी कामांची प्रगती तपासून प्रलंबित बाबींचा निपटारा करावा. दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देणे, जलसंधारणाच्या कामांना चालना देणे आणि मंजूर कामे वेळेत पूर्ण करणे, हा या उपाययोजनांचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई न करता सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

कामांच्या गुणवत्तेसह पारदर्शकतेवर भर

रोजगार हमी योजनेतील आर्थिक शिस्त आणि मजुरी-साहित्य प्रमाणाचे नियमित परीक्षण करण्यावर भर द्यावा. कामांची दुबार नोंद,मस्टर-मोजमाप-भुगतानातील विसंगती आणि संशयास्पद व्यवहार यांचा चखड प्रणालीद्वारे नियमित आढावा घ्यावा. दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली अपूर्ण कामे वर्गीकृत करून त्यातील प्रशासकीय, तांत्रिक आणि आर्थिक अडचणी दूर कराव्यात. प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याची खात्री करूनच ऑनलाइन नोंदी पूर्ण कराव्यात. विकसित ग्रामपंचायत आराखडा (तऋझझ) ऑनलाइन नोंदणी, मजुरांचे प्रलंबित ई-केवायसी, जिओ-टॅगिंग आणि कॅग ऑडिटमधील अनुपालनाच्या बाबींचाही प्राधान्याने निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मातोश्री शेत पाणंद रस्त्यांसाठी ११६ कोटी रुपयांचे पूरक कुशल अनुदान वितरित

- **रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले**
- **दुष्काळ आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत झालेल्या कामांसाठी राज्य रोहयोचे पूरक कुशल अनुदान म्हणून ११६ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या निर्देशानुसार ही कार्यवाही करण्यात आली असून, दुष्काळी परिस्थिती आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे.

शेतकऱ्यांच्या शेतीशी संबंधित अडचणी दूर करून ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित यंत्रणेला निधी वितरणाबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्दे श मंत्री भरत गोगावले यांनी दिले होते. त्यानुसार मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत झालेल्या कामांसाठ हा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी बारमाही रस्ते उपलब्ध व्हावेत तसेच शेतीची मशागत आणि शेतमालाची वाहतूक सुलभ व्हावी, या उद्देशाने राज्य शासनाकडून मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजना राबविण्यात येत आहे. वितरित करण्यात आलेल्या निधीमुळे उर्वरित कामांना गती मिळण्यास मदत होणार आहे.पाणंद रस्ते हे ग्रामीण शेतीव्यवस्थेतील महत्त्वाचे पायाभूत साधन आहे. शेतमाल बाजारपेठेत पोहोचविणे, शेतीची दैनंदिन कामे करणे आणि शेतापर्यंत पोहोचणे यासाठी या रस्त्यांचा उपयोग होतो. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहताना ग्रामीण भागातील विकासकामेही थांबू नयेत, या भूमिकेतून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात आली आहे. यापुढेही निधी उपलब्ध होईल तसा तातडीने वितरीत करण्यात येईल, असे सांगून रोहयो मंत्री गोगावले यांनी यानिमि त्ताने शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा विश्वास देऊन दिवाळीनिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

वाढदिवस माझा, आनंद सर्वांचा! जयश्री रसाळ यांची माणुसकी जपणारी अनोखी परंपरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



शिरूर : वाढदिवस म्हटले की केक, भेटवस्तू आणि जल्लोष हे सम ीकरण सर्वसाधारणपणे पाहायला मि ळते. मात्र, आपल्या आयुष्यातील आनंदाचा क्षण समाजातील वंचित, निराधार आणि गरजू व्यक्तींसोबत साजरा करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा अनोखा आदर्श शिरूर शहरातील उद्योजिका व मेकअप आर्टिस्ट जयश्री रसाळ यांनी निर्माण केला आहे. स्वतः चा वाढदिवस थाटामाटात साजरा करण्याऐवजी अनाथ मुले, वृद्ध आणि मूकबधिर बांधवांच्या सहवासात साजरा करण्याची त्यांची परंपरा गेल्या पाच वर्षांपासून अविरत सुरू आहे. जयश्री रसाळ या शिरूर परिसरातील गोकूळ वृद्धाश्रम, सिंधुताई सपकाळ यांच्या मनशांती अनाथ आश्रम तसेच न्हावरा फाटा येथील निवासी मूकबधिर आश्रमाला भेट देऊन तेथील रहिवाशांना जेवण, खाऊ, धान्य आणि गरजेच्या वस्तूंचे वाटप करतात. या उपक्रमातून त्या केवळ मदतच करत नाहीत, तर या व्यक्तींना आपुलकी, प्रेम आणि आपल्या माणसांचा सहवासही देतात. विशेष म्हणजे, आपल्या अकॅडमीमधील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन त्या अनाथ मुलांसोबत वाढदिवस साजरा करतात. मुलांच्या चेहऱ्यावर उमटणारे हास्य, त्यांच्यासोबत घालवलेले आनंदाचे क्षण आणि त्यांच्या निरागस भावनांमधून मिळणारे समाधान हे कोणत्याही मोठ्या समारंभापेक्षा वेगळे असल्याचे जयश्री रसाळ यांनी सांगितले. वाढदिवसाच्या निमित्ताने सामाजिक कार्य करण्याबरोबरच महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेनेही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मेकअप आर्टिस्ट म्हणून कार्यरत असलेल्या जयश्री रसाळ या आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना वेळोवेळी मेकअप क्षेत्रातील कौशल्यांचे मोफत मार्गदर्शन करतात. महिलांनी स्वतःच्या कौशल्यावर उभे राहून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, त्यांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात आणि आत्म विश्वासाने जीवन जगता यावे, यासाठी त्या प्रयत्नशील असतात.

गायरान व वैयक्तिक जमिनीवर अतिरिक्त चारा पिकांच्या लागवडीला मान्यता:रोहयो मंत्री भरत गोगावले

विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशनअंतर्गत सामुदायिक व वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : राज्यातील दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईची तीव्रता कमी करून पशुधनासाठी हिरवा व सुका चारा उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाने गायरान तसेच वैयक्तिक जमिनीवर अतिरिक्त चारा पिकांच्या लागवडीला मान्यता दिली आहे. महाराष्ट्र रोजगार हमी-विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्राम ीण) अंतर्गत सामुदायिक उपयोगासाठी आणि वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी ही कामे घेता येणार असल्याची माहिती रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला आहे.

सन २०२६ मधील नैऋत्य मोसमी पावसाची तूट, पावसाचे असमान वितरण, खरीप पिकांच्या उत्पादनातील घट आणि रब्बी हंगामातील संभाव्य घट यामुळे पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याच्या उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूम ीवर शासनाने यापूर्वी मंजूर केलेली चारा पिके व वैरणयुक्त वृक्षांसह आणखी लागवडयोग्य चारा पिकांचा योजनेत समावेश केला आहे. विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत अनुज्ञेय ३७५ कामांपैकी 'उपजीविकेशी संबंधित पायाभूत सुविधा' या प्रवर्गात सामुदायिक उपयोगासाठी चारा लागवड आणि वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी चारा लागवड या दोन कामांचा समावेश आहे. शासनाने या दोन्ही प्रकारच्या कामांसाठी अतिरिक्त चारा पिकांची अंदाजपत्रकेही निश्चित केली आहेत.

लाभार्थ्यांना अनुज्ञेय वाणांचे बियाणे महाबीज, राष्ट्रीय बीज महामंडळ, एचआयएल, कृभको, एनएफएल, आयएफएफडीसी, भारतीय कृषी संशोधन परिषद, कृषी विज्ञान केंद्र किंवा अन्य मान्यताप्राप्त संस्थांकडून उपलब्ध करून घेता येईल. कमी पाण्यात येणाऱ्या, कमी कालावधीत उत्पादन देणाऱ्या आणि एकापेक्षा अधिक वेळा कापणी करता येणाऱ्या चारा पिकांच्या वाणांना प्राधान्य दिले जाणार आहे. स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार, सिंचनाची शाश्वत उपलब्धता आणि पीक कालावधी विचारात घेऊन पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी योग्य वाणांची शिफारस करणार आहेत.

तर, ग्रामपंचायत, कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभाग या कामांच्या कार्यान्वयीन यंत्रणा असतील. ग्रामपंचायतीच्या कामांना तालुका पशुधन विकास अधिकारी तांत्रिक, तर गटविकास अधिकारी प्रशासकीय म ान्यता देतील. कृषी विभागाच्या कामांसाठी कृषी पर्यवेक्षक तांत्रिक आणि तालुका कृषी अधिकारी प्रशासकीय मान्यता देतील. पशुसंवर्धन विभागाच्या कामांसाठी पशुवैद्यकीय अधिकारी तांत्रिक, तर सहायक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी प्रशासकीय मान्यता देतील.

तांत्रिक सहायक या कामांची मोजमापपुस्तिकेत नोंद करणार असून संबंधित अधिकाऱ्यांनी या नोंदी प्रमाणित केल्यानंतर कार्यान्वयीन यंत्रणा विहित पद्धतीने देयके तयार करून ऑनलाइन अदा करतील. शासनाने सहायक आयुक्त, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालयांना चारा लागवडीसह पशुसंवर्धन विभागाशी संबंधित अन्य अनुज्ञेय कामांसाठी कार्यक्रम अधिकारी म्हणून घोषित करून प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान केले आहेत. या कामांमध्ये मजुरांच्या श्रमांना प्राधान्य देणे बंधनकारक राहणार असून मजुरांमार्फत करता येणाऱ्या काम ांसाठी यंत्रसामग्रीचा वापर करता येणार नाही. तसेच योजनेतून एकदा चारा लागवड केलेल्या क्षेत्रावर पुन्हा त्याच क्षेत्रासाठी चारा लागवडीचे काम मंजूर होणार नाही. लाभार्थ्यांची निवड, कामांचे नियोजन, सामाजिक अंकेक्षण आणि आर्थिक मर्यादांसह योजनेच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करावे लागेल, असे रोहयो मंत्री गोगावले यांनी स्पष्ट केले आहे.



नागेश अडगावकर यांच्या सुरेल गायनाने आळंदीत दिवाळी पहाट रंगली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी देवाची : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात आयोजित दिवाळी संगीत महोत्सवात गायक नागेश अडगावकर यांच्या सुरेल गायनाने दिवाळी पहाटचा कार्यक्रम रंगला. अभंग, शास्त्रीय संगीत आणि भक्तिसंगीताच्या सुरेल आविष्कारातून त्यांनी उपस्थित रसिकांना स्वरानंदाची अनुभूती दिली.

अडगावकर यांनी 'ज्या सुखा कारणे देव वेडावला' या अभंगासह 'कोई कहियो रे प्रभु आवन की' यांसारख्या लोकप्रिय रचना सादर केल्या. त्यांच्या गायनातील सुरेलता आणि भावपूर्ण सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. भक्तिरस आणि शास्त्रीय संगीताच्या संगम ाने मंदिर परिसर स्वरमय झाला.

यावेळी हभप अॅड.जयवंत महाराज बोधले, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य महाराज कबीरबुवा, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, श्रीकांत लवांडे, बाळकृष्ण मोरे, ह.भ.प.उमेश महाराज बागडे, संतोषानंद शास्त्री आणि ज्ञानेश्वर मेश्राम उपस्थित होते.

दुष्काळी तालुक्यांतील गाळपेरा क्षेत्र चारा पिकांसाठी उपलब्ध

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड
शेतकरी-पशुपालकांना भाडेपट्ट्याने वाटप
पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : राज्य शासनाने दुष्काळी घोषित केलेल्या ३०४ तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील जलाशय आणि तलावांम धील लागवडीयोग्य गाळपेरा क्षेत्र शेतकरी व पशुपालकांना अल्पकालीन चारा पिकांच्या लागवडीसाठी भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या क्षेत्रात मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, बरसीम, ओट आदी चारा पिके घेता येतील, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या शासन निर्णयाची अधिक माहिती देताना मंत्री राठोड म्हणाले, खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्याची तूट आणि अन्य घटकांच्या आधारे राज्यातील ३०४ तालुके दुष्काळी तालुके म्हणून घोषित केले आहेत. या भागातील जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी मृद व जलसंधारण विभागाने ५ नोव्हेंबर २०२६ रोजी तांत्रिक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचना लघु पाटबंधारे तलाव, साठवण तलाव, पाझर तलाव, गाव तलाव, माजी मालगुजारी तलाव आदी जलसाठ्यांना लागू राहतील. पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी आरक्षित असलेल्या किंवा टँकर भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जलसाठ्यांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणाला प्रथम प्राधान्य राहील. दुरुस्ती, गाळ काढणे किंवा पुनर्स्थापनेची कामे सुरू अथवा प्रस्तावित असलेले क्षेत्र गाळपेरा लागवडीसाठी उपलब्ध केले जाणार नाही.

जलाशयाची पूर्ण संचय पातळी आणि प्रत्यक्ष जलपातळी यांदरम्यान उघडे पडलेले लागवडीयोग्य क्षेत्रच गाळपेरा क्षेत्र म्हणून निश्चित केले जाईल. धरणाच्या मातीच्या भिंतीच्या जलाशयाकडील पायथ्यापासून किमान ५० मीटर, सांडवा व त्याच्या प्रवेशमार्गापासून किमान ३० मीटर तसेच विमोचक, इनटेक विहीर, जॅकवेल, गेज पोल आणि बेंचमार्कच्या सभोवतालचे किमान ३० मीटर क्षेत्र प्रतिबंधित राहील. पिण्याच्या पाण्याच्या उद्भव विहीर किंवा जॅकवेलच्या २०० मीटर परिसरात रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर असलेल्या लागवडीला परवानगी मिळणार नाही. महसूल, कृषी, पशुसंवर्धन आणि मृद व जलसंधारण विभागांचे अधिकारी संयुक्त सर्वेक्षण करून गाळपेरा उपलब्धता अहवाल तयार करतील. संबंधित कार्यकारी अभियंता हा अहवाल शासन निर्णयाच्या दिनांकापासून १५ दिवसांत जिल्हास्तरीय समितीला सादर करतील. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती प्रकल्पनिहाय उपलब्ध क्षेत्राचा आढावा घेऊन वाटपाला मान्यता देईल, लाभार्थी निवडेल आणि प्रति लाभार्थी क्षेत्राची कमाल मर्यादा निश्चित करेल.चारा पिके प्रामुख्याने जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर घ्यावी लागतील. पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी आवश्यक पाणी आरक्षित केल्यानंतर अतिरिक्त पाणीसाठा असल्यासच कार्यकारी अभियंत्यांच्या लेखी परवानगीने संरक्षित सिंचन करता येईल. त्यासाठी ठिबक किंवा तुषार सिंचनाला प्राधान्य राहील. जलाशयाची पाणीपातळी मृतसाठ्यापर्यंत किंवा पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित पातळीपर्यंत पोहोचल्यानंतर सिंचनासाठी पाणी उपसा करता येणार नाही.

गाळपेरा क्षेत्रात मुरघासासाठी मका आणि ज्वारीला प्राधान्य देण्यात आले आहे. ऊस, फळपिके, बहुवार्षिक पिके तसेच अन्नधान्य किंवा नगदी पिके घेता येणार नाहीत. लाभार्थ्यांना पीक काढणी पूर्ण करून ३१ मे २०२७ पूर्वी जमीन विभागाच्या ताब्यात परत करावी लागेल. पाणीपातळी वाढल्यामुळे उभे पीक बुडाल्यास नुकसानभरपाई मिळणार नाही. जमिनीची मशागत कमाल २० सेंटीमीटर खोलीपर्यंत करता येईल. गाळ, माती, मुरूम किंवा वाळूचे उत्खनन व वाहतूक; नवीन विहीर, बोअरवेल, शेततळे, खड्डे किंवा चर खोदणे; तसेच बांधकाम, कुंपण, रस्ता, झोपडी किंवा वृक्षलागवड करण्यास मनाई राहील. धरणाच्या भिंतीवरून ट्रॅक्टर किंवा अवजड वाहनांची वाहतूक आणि पीक अवशेष जाळण्यासही परवानगी नसेल. अटींचे उल्लंघन झाल्यास कार्यकारी अभियंता परवानगी तात्काळ रद्द करतील आणि संरचना किंवा जलसाठ्याच्या नुकसानीचा खर्च संबंधित लाभार्थ्याकडून वसूल केला जाईल, असे त्यांनी सांगितले. तहसीलदार उपलब्ध क्षेत्र, भाडेपट्ट्याचा कालावधी, भाडेदर आणि अर्जासाठी किमान १५ दिवसांची मुदत गावचावडी, ग्रामपंचायत, तहसील कार्यालय आणि दवंडीद्वारे प्रसिद्ध करतील. इच्छुक व्यक्ती किंवा सहकारी संस्थांनी रहिवासी दाखला, जमीनधारणेचे उतारे किंवा भूमिहीन दाखला तसेच लागू असल्यास जात, प्रकल्पग्रस्त, संस्था नोंदणी आणि पशुधनविषयक कागदपत्रांसह संबंधित तहसीलदारांकडे अर्ज करावा, असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले.

द•ख•ल

शेवगांव येथील बहुचर्चित शेअर फसवणूक प्रकरण
नानासाहेब घनवट यांचा जामीन अर्ज फेटाळला

अहिल्यानगर : शेवगाव पोलीस ठाण्यात फसवणूक प्रकरणात आरोपी असलेल्या नानासाहेब हरिभाऊ घनवट याने जिल्हा न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केला असा न्यायालयाने सदरच अर्ज फेटाळून लावला. याबाबत सविस्तर माहिती अशी की, शेवगाव पोलीस ठाण्यात दि. १२/०७/२०२६ रोजी संदिप सुभाष शिंदे, (रा. हिवरे, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) याने आरोपी नानासाहेब हरीभाऊ घनवट याचे विरुध्द फिर्याद दिली होती की, आरोपी याने फिर्यादी शिंदे यास त्याच्या शेवगांव येथील एन ॲण्ड एन असोसिएटस् नावाच्या शेअर मार्केट ट्रेडिंगच्या ऑफिसवर बोलावून घेऊन माझ्याकडे गुंतवणुक करा, मी तुम्हांस प्रती महिना ६% परतावा देईल असे सांगून विशवास संपादन करुन आरोपीने फिर्यादीकडून ३२, लाख रुपये स्वीकारले व ३ वर्ष त्यास कोणतीही रक्कम दिली नाही. शेवटी वाट पाहून फिर्यादी याने फोनहून पैशाची मागणी केली असता, त्याने फिर्यादीस शिवीगाळ करुन म्हणाला की, तुझे पैसे मी देणार नाही, तुला काय करायचे ते करुन घे व शेवगांवमध्ये येऊन माझ्या भावास पैशाची मागणी केली तर गाडीखाली मारुन टाकीन अशी धमकी दिली अशी फिर्याद दिल्याने शेवगांव पोलिसांनी आरोपी विरुध्द महाराष्ट्र ठेवीदारांचा संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३,४ तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३१८, ३१६, ३१६ (१) अन्वये गुन्हा दाखल केला. पोलीस तपासात अन्य ठेवीदारांचे पण ४४ लाख रुपये असे एकंदर ७६ लाख रुपये जमा केले म्हणून आरोपी यास शेवगांव पोलिसांनी अटक केली. दरम्यान अटक असलेला आरोपीने जिल्हा न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला असता, तो फेटाळण्यात आला. त्यानंतर लगेचच आरोपीतर्फे येथील जिल्हा न्यायालयात पुन्हा जामीन अर्ज दाखल केला असता तो जामीन अर्ज देखील जिल्हा न्यायालयाने फेटाळला. जिल्हा न्यायालयात दोन्ही वेळेस मुळ फिर्यादीतर्फे ॲड. सतिशचंद्र सुद्रीक यांनी काम पाहिले.

छत्रपती शिवरायांच्या चरणी दीपांजली

जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने जुने बसस्थानक परिसर दुमदुमला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दिवाळीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांना दीप अर्पण करून करण्याची परंपरा जपत अहिल्यानगरमध्ये शिवप्रेमींनी अनोखा दीपोत्सव साजरा केला. मराठा समन्वय परिषदेच्या वतीने शनिवारी (दि. ७ नोव्हेंबर) जुने बसस्थानक परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याभोवती दीपप्रज्वलन करण्यात आले. पणत्यांच्या प्रकाशाने उजळलेल्या या परिसरात शिवप्रेमींचा उत्साह आणि शिवरायांप्रती असलेली श्रद्धा अनुभवायला मिळाली.

'जय भवानी, जय शिवाजी', 'जय जिजाऊ... जय शिवराय', 'जय शंभूराजे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. महिला, युवक-युवतींसह मोठ्या संख्येने शिवप्रेमींनी या उपक्रमात सहभागी होत महाराजांच्या चरणी दीपांजली अर्पण केली. पणत्यांच्या प्रकाशात उजळलेला महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि वातावरणात घुमणारा शिवरायांचा जयघोष यामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

या दीपोत्सवात मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे, प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा लकाताई मुंदडा, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा ड. स्वाती जाधव, लीला अग्रवाल, सुचिता बोरकर, अरुणा गोयल, मेघना मुनोत, निष्ठा सुपेकर यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

यावेळी मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे म्हणाल्या की, दिवाळी हा बळीराजाच्या कष्टाचा आणि समृद्धीचा उत्सव आहे. मात्र, रयतेचे राज्य निर्माण करून स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण केल्याशिवाय हा आनंदोत्सव पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे दिवाळीतील पहिला दिवा महाराजांच्या चरणी अर्पण करून त्यांच्या विचारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे. हा केवळ दीपोत्सव नसून महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि स्वाभिमानाचा उत्सव असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



दुष्काळाच्या झळांनी बळीराजा होरपळला
वंचित बहुजन आघाडीची 'काळी दिवाळी'!

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चटणी-भाकर खाऊन सरकारचा निषेध



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महाराष्ट्रातील भीषण दुष्काळी परिस्थिती, शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाची होत असलेली होरपळ याकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रमक 'काळी दिवाळी' आंदोलन करण्यात आले. केंद्रीय समिती सदस्य प्रा. किसन चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी आंदोलकांनी चटणी-भाकर खाऊन बळीराजा आणि कष्टकरी बांधवांच्या वेदनांशी एकरूप होत अनोख्या पद्धतीने काळी दिवाळी साजरी केली. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री यांच्या नावे जिल्हा प्रशासनाला देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, २०२६ च्या मान्सून हंगामात पावसात सुमारे १८ ते १९ टक्के तूट राहिल्याने राज्यातील ३५८ पैकी तब्बल ३०४ ते ३०५ तालुके म्हणजेच सुमारे ८५ टक्के भाग दुष्काळाच्या छायेत आला आहे. मराठवाड्यात ३८ टक्के, तर विदर्भात २७ टक्के पावसाची तूट नोंदविण्यात आली आहे. या आंदोलनात केंद्रीय समिती सदस्य प्रा. किसन चव्हाण, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जामखेड नगरसेविका संगीताताई भालेराव, सूरज भालेराव, पोपट शेटे, चंद्रकांत पातारे, राजीव भिंगारदिवे, हनीफ शेख, मनोज साळवे, दीपक साहेबराव चांदणे, जिल्हा सल्लागार शिरसाठ जे. डी., प्रा. दादा समुद्र आणि संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष संदीप यादव यांनी जाहीर पाठिंबा देत सहभाग नोंदविला. याशिवाय शाहूराव खंडागळे, बन्नू शेख, संतोष जैंजाळ, गणेश साहेबराव फाजगे, रविंद्र जैंजाळ, अविनाश धनवे, अरुण झांबरे, प्रज्योत शिर्के, सुशील साळवे, चंद्रकांत नेटके, प्रतिक जाधव, संदीप पवार, संदिप ठोंबे, योगेश शिंगाडे, रविंद्र शिरसाठ, देविदास भालेराव, पृथ्वीराज काळे, प्रशांत शिंदे, रंजित मेघडबर, अतिश पारवे, राजन मेघदंबर, प्रेम जाधव, पातारे विकास, किशोर शिंदे, गणेश सूर्यवंशी, यश शिंदे, प्रथमेश शिंदे, पार्थ शिंदे, संदेश शिंदे, साहिल शेख, सौरभ सातपुते, सुनिल ठोकळ, सार्थक भराटे, अनुराज आंधळे, सिद्धार्थ बारगजे, ईश्वर बारसकर, पप्पू चव्हाण, पोपटराव थोरात यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी आणि कष्टकरी बांधव उपस्थित होते.

'फेअरी टेल्स' आणि 'बीइंग ह्युमन' संकल्पनांतून विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरचे दहावे वार्षिक स्नेहसंमेलन ३ व ४ नोव्हेंबर रोजी सावेडी येथील मौली सभागृहात उत्साहात पार पडले. दोन दिवस चाललेल्या या सांस्कृतिक सोहळ्यात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, संगीत आणि अभिनयातून कलागुणांचे दर्शन घडविले. प्राथमिक विभागासाठी 'फेअरी टेल्स - व्हेअर स्टोरीज डान्स, ड्रीम्स फ्लाय अँड मॅजिक कम्स अलाइव्ह', तर माध्यमिक विभागासाठी 'बीइंग ह्युमन - बी द रिझन फॉर समवन टू बिलीव्ह इन गुडनेस' या संकल्पना मांडण्यात आल्या होत्या.

३ नोव्हेंबर रोजी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम झाला. यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त रेवनाथ विसले आणि जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच पोदार



मांजरीच्या प्राचार्या मीनल वैद्य, पुनावालाच्या रिंकू अग्रवाल, खोपोलीच्या वैशाली रणसुभे आणि वाकडचे अग्नेल कारव्हॅलो उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सिंड्रेला, स्नो व्हाइट, अलादीन आणि जंगल बुक या परीकथांवर आधारित नृत्य व नाटिका सादर करून रंगमंचावर जादुई विश्व साकारले.

४ नोव्हेंबर रोजी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम झाला. यावेळी लष्करी वाहनांच्या गुणवत्तेहमीचे पर्यवेक्षण करणारे ब्रिगेडियर राजीव चावला व सौ. प्रियंका चावला तसेच शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यासह पोदार रोहकलचे विशाल जाधव, दौंडच्या स्वाती कणसे, पुणे हबचे जनरल मॅनेजर मनोज काळे, वाघोलीचे मनीष शर्मा, हडपसरचे ए. के. सिंह, तळेगावचे सुधांशू नायक, उंड्रीचे संजीव भारद्वाज, नाशिकचे डॉ. मनोहर महाजन, चाळीसगावचे अजय घोरपडे, शिरूरचे नीरज राय, इगतपुरीचे संदेश खताळ आणि रयत इंग्लिश मीडियम स्कूल, साताऱ्याचे मॅनेजर महेंद्र काटकर उपस्थित होते.

दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमांची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने झाली. माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी माणुसकी, प्रेम, दया, सहानुभूती, समानता, परोपकार आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांवर आधारित सादरीकरण केले. गरजूंना मदत करणे, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे आणि छोट्या कृतीतून इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करणे, असे संदेश प्रभावीपणे मांडले.

प्राचार्य मंगेश जगताप यांनी मार्गदर्शन करताना परीकथांमधून विद्यार्थ्यांमध्ये कल्पनाशक्ती, धैर्य, मैत्री आणि प्रामाणिकपणा यांसारखी मूल्ये रुजतात, असे सांगितले. शिक्षणाचा उद्देश केवळ शैक्षणिक यश नसून संवेदनशील व जबाबदार नागरिक घडविणे हा आहे. 'चांगुलपणावर विश्वास ठेवण्याचे कारण कोणासाठी तरी बना' हा संदेश विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात आचरणात आणावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रमुख पाहुणे रेवनाथ विसले यांनी सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, कल्पनाशक्ती आणि संघभावना विकसित होत असल्याचे सांगून सादरीकरणाचे कौतुक केले. ब्रिगेडियर राजीव चावला यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मानवी मूल्ये जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजकल्याणासाठी करावा, असा संदेश त्यांनी दिला.

आविष्कार संशोधन स्पर्धेत पायरेन्सच्या दोन विद्यार्थ्यांचा प्रथम क्रमांक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

लोणी : पायरेन्सच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड डमिनिस्ट्रेशन (आयबीएमए) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'आविष्कार संशोधन प्रकल्प स्पर्धा २०२६'मध्ये उल्लेखनीय यश मिळविले आहे. एमबीए द्वितीय वर्षातील अदित्य चतुर आणि सृष्टी चौधरी यांनी विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाच्या यशात भर घातली. या दोघांचीही विद्यापीठस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अदित्य चतुर याने 'इंटेलिजंट लेजर बॉर्डर सिक्युरिटी अँड थ्रेट डिटेक्शन सिस्टम' हा संशोधन प्रकल्प सादर केला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सीमावर्ती भागातील संभाव्य धोके ओळखून सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याची संकल्पना त्याने या प्रकल्पातून मांडली. तर सृष्टी चौधरी हिने 'क्वागार्ड आयओटी-आधारित स्मार्ट वॉटर लिकेज डिटेक्शन अँड प्रिव्हेंशन सिस्टम' हा प्रकल्प सादर केला. या यंत्रणेद्वारे पाण्याची गळती अचूकपणे शोधून ती रोखण्याचा अभिनव प्रयत्न करण्यात आला आहे. दोन्ही प्रकल्पांना परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील आणि संस्थेचे सचिव तथा संचालक डॉ. निलेश बनकर यांनी अभिनंदन केले. आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी ही माहिती दिली.

वाढदिवसाचा आनंद अनाथ मुलांसोबत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : वाढदिवस म्हणजे केवळ केक कापणे, भेटवस्तू आणि आनंदोत्सव नव्हे, तर आपल्या आनंदात समाजातील वंचित घटकांनाही सहभागी करून घेण्याची संधी असते. याच सामाजिक भावनेतून भाजप युवा मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष इंजि. रोहन कुटे पाटील यांनी आपली कन्या सान्वी हिचा वाढदिवस ६ नोव्हेंबर रोजी उपनगरातील बालघर प्रकल्पातील अनाथ मुलांसोबत साजरा केला. या उपक्रमातून मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासोबतच वाढदिवस साजरा करण्याचा एक वेगळा सामाजिक आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला.

या निमित्ताने बालघरातील मुलांना दिवाळीनिमित्त फटाक्यांचे वाटप करण्यात आले, तसेच सर्व मुलांसाठी मिष्टान्न भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. सण-उत्सव आणि वाढदिवसाच्या आनंदापासून वंचित राहणाऱ्या मुलांनाही या आनंदात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला. विशेष म्हणजे, अहिल्यानगरच्या महापौर ज्योती गाडे यांचाही वाढदिवस असल्याने त्यांनीदेखील बालघरातील मुलांसोबत केक कापून वाढदिवस साजरा केला. त्यामुळे मुलांसाठी हा दिवस अधिकच आनंददायी ठरला. यावेळी कुटे पाटील परिवारासह मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. याप्रसंगी इंजि. रोहन कुटे पाटील यांनी नागरिकांना सामाजिक जाणीव जपत वाढदिवस आणि कौटुंबिक आनंदाचे क्षण साजरे करण्याचे आवाहन केले. वाढदिवसावर अनावश्यक खर्च करण्याऐवजी अनाथ, गरजू आणि वंचित मुलांसोबत आनंदाचे क्षण घालविल्यास त्यांच्या जीवनातही आनंद निर्माण होऊ शकतो. अशा मुलांना आपलेपणाची जाणीव देणे, त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविणे आणि त्यांच्यासोबत काही वेळ घालविणे हीच खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील आनंदाच्या प्रसंगी समाजातील गरजू घटकांचा विचार करून असे उपक्रम राबवावेत, असे आवाहनही त्यांनी केले. समाजातील वंचित मुलांना आनंदाचे क्षण देणारे असे उपक्रम केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता त्यातून सामाजिक संवेदनशीलता आणि मदतीची भावना वाढीस लागणे गरजेचे आहे. सान्वीच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमाने हाच सकारात्मक संदेश दिला.

महासंघ निवडणुकीसाठी नाहाटांची मोर्चेबांधणी

पुत्र मितेशला बाजार समितीत संचालक करण्याची रणनीती!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : राज्य बाजार समिती महासंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा बाजार समितीतील राजकीय हालचालींना वेग येण्याची चिन्हे आहेत. महासंघाचे माजी सभापती व विद्यमान संचालक बाळासाहेब नाहाटा यांनी पुत्र मितेश नाहाटा यांना महासंघाच्या निवडणुकीत उतरविण्यासाठी आतापासूनच राजकीय मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यासाठी श्रीगोंदा बाजार समितीतील विद्यमान संचालकाचा राजीनामा घेऊन त्या जागी मितेश यांना संचालक करण्याची रणनीती आखली जात असल्याची चर्चा आहे.राज्य बाजार समिती महासंघाची निवडणूक आगामी सहा महिन्यांत होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत उमेदवारीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचा मतदानाचा ठराव आवश्यक असतो.

हा ठराव बाजार समितीच्या संचालकाच्या नावाने करता येत असल्याने मितेश नाहाटा यांना प्रथम श्रीगोंदा बाजार समितीचे संचालकपद मिळविणे आवश्यक आहे. याच उद्देशाने बाळासाहेब नाहाटा यांनी स्थानिक राजकीय समीकरणांची जुळवाजुळव सुरू केली आहे.

या पार्श्वभूमीवर नाहाटा यांनी माजी आमदार राहुल जगताप, राजेंद्र नागवडे, दत्तात्रय पानसरे, साजन पाचपुते आणि बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांच्याशी स्वतंत्र बैठका घेऊन प्राथमिक चर्चा केल्याचे समजते. मितेश यांच्यासाठी दत्तात्रय पानसरे किंवा साजन पाचपुते यांच्यापैकी एकाने संचालकपदाचा राजीनामा द्यावा, असा पर्याय चर्चेत असल्याची माहिती आहे.

रिक्त जागेवर संचालक मंडळामार्फत नवीन संचालकाची निवड करण्याच्या प्रक्रियेतून मितेश यांना संधी देण्याचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.आता बाजार समितीच्या संचालक मंडळातही राजकीय डावपेच रंगणार, हे मात्र निश्चित! श्रीगोंदा बाजार समितीवर माजी आमदार राहुल जगताप यांच्या गटाचे वर्चस्व आहे.

पद्मशाली युवाशक्तीचा माणुसकीचा दीपोत्सव

१०० वृद्धांपर्यंत पोहोचविला दिवाळीचा फराळ!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दिवाळी म्हणजे आनंदाचा, मांगल्याचा आणि प्रकाशाचा उत्सव! या सणानिमित्त प्रत्येक घरात नवीन कपड्यांची खरेदी, मिठाई व फराळाची तयारी आणि आप्तस्वकीयांच्या भेटीगाठींची लगबग सुरू असते. मात्र, समाजात आजही असे अनेक वंचित, निराधार आणि वृद्ध बांधव आहेत, ज्यांच्या आयुष्यात दिवाळीचा आनंद वाटून घेणारे कुणी नसते. अशा व्यक्तींच्या आयुष्यातही सणाचा गोडवा आणि आनंद फुलावा, या उदात्त भावनेतून पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टच्या वतीने दिवाळीच्या मंगलपर्वावर फराळ वाटपाचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला.

दिवाळीच्या दिवशी सकाळी ठीक ९ वाजता पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टचे युवक फराळाची पाकिटे घेऊन नित्यसेवा, पद्मानगर, श्रमिकनगर, तोफखाना, दातरंगे मळा, शिवाजीनगर आणि स्टेशन रोड या सात भागांतील वंचित व वृद्ध व्यक्तींच्या घरी पोहोचले. या उपक्रमांतर्गत एकूण १०० वृद्ध व गरजू व्यक्तींना फराळाचे वाटप करण्यात आले. केवळ फराळाचे वाटप न करता त्यांची आस्थेने विचारपूस करून दिवाळीच्या शुभेच्छा देत आपुलकीचा स्नेहबंध जपण्यात आला.

विशेष म्हणजे, गेल्या ११ वर्षांपासून पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टने ही सेवापरंपरा अखंडितपणे जपली आहे. याविषयी माहिती देताना श्रीनिवास इप्पलपेल्ली यांनी सांगितले की, समाजातील प्रत्येक घटकाला दिवाळीचा आनंद अनुभवता यावा, या भावनेतून दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो.

फराळ वाटप करताना छायाचित्रे काढण्याबाबत काही जणांकडून संमिश्र मते व्यक्त केली जातात. गरजू व्यक्तींचा स्वाभिमान जपला जाणे निश्चितच महत्त्वाचे आहे. मात्र, या उपक्रमाचे छायाचित्रण करण्यामागे प्रसिद्धी मिळविण्याचा किंवा स्वतःचे मोठेपण सिद्ध करण्याचा कोणताही हेतू नाही. समाजातील इतर सेवाभावी संस्था, युवक मंडळे आणि दानशूर व्यक्तींनीही अशा उपक्रमांची प्रेरणा घेऊन वंचितांच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, हाच यामागील एकमेव उद्देश आहे. एखाद्या चांगल्या कार्याची माहिती समाजापर्यंत पोहोचल्यास त्यातून अनेकांना प्रेरणा मिळून मदतीचे आणखी हात पुढे येऊ शकतात. प्रसिद्धी मिळविण्यासाठी नव्हे, तर प्रेरणेचा



दीप प्रज्वलित करण्यासाठी हा उपक्रम समाजासमोर मांडला जात आहे.

या उपक्रमामुळे भारावून गेलेल्या वृद्ध महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, दरवर्षी दिवाळीच्या दिवशी पद्मशाली युवाशक्तीचे युवक आमच्या घरी येऊन फराळ देतात आणि शुभेच्छा देतात. त्यामुळे जणू आमच्या माहेरच्या माणसांनीच दिवाळीचा प्रेमळ निरोप आमच्या घरापर्यंत पोहोचविला आहे, अशी भावना मनात निर्माण होते. त्यांच्या या भावपूर्ण प्रतिक्रियेतून उपक्रमाचे खरे समाधान आणि सार्थकता अधोरेखित झाली.

आजच्या धावपळीच्या जीवनात स्वतःचा आनंद साजरा करताना दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. एखाद्याला दिलेले फराळाचे पाकीट कदाचित आर्थिकदृष्ट्या छोटे असेल; परंतु त्यामागील प्रेम, आपुलकी आणि माणुसकीचे मोल अमूल्य आहे. दिव्यांच्या प्रकाशापेक्षा माणुसकीचा प्रकाश अधिक तेजस्वी असतो, याची प्रचिती या उपक्रमातून आली.

या सेवाभावी उपक्रमात पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टचे योगेश म्याकल, सुमित इप्पलपेल्ली, संजय चिप्पा, प्रवीण कट्टा, सतीश चिंता, अजय म्याना, दीपक गुंडू, श्रीनिवास इप्पलपेल्ली, विनोद म्याना, शुभम बोल्ली, योगेश ताटी, ओम कुरापट्टी, सागर बोगा, सागर आरकल, सागर मेहसुनी, विराज म्याना आणि वेदांत म्याना यांनी सक्रिय सहभाग घेतला.

दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंदाची पणती पेटविणे, हीच खऱ्या अर्थाने दिवाळी! पद्मशाली युवाशक्ती ट्रस्टने गेल्या अकरा वर्षांपासून जपलेली ही सेवापरंपरा केवळ एक उपक्रम नसून, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा सुंदर आदर्श ठरत आहे.

दैनिक राष्ट्रसह्याद्री

सोमवार, दि.०९ नोव्हेंबर २०२६ । पान ६

अंगणात रांगोळीचा साज....पणत्यांच्या प्रकाश.... पारंपरिक पद्धतीने दिवाळीचा सर्वत्र उत्साह

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : दिवाळीचा सण म्हणजे केवळ रोषणाई आणि फटाक्यांचा उत्सव नाही, तर परंपरा, संस्कृती आणि कौटुंबिक जिव्हाळ्याचा अनोखा सोहळा असतो. दिवाळीच्या निमित्ताने शहर आणि गावागावातील प्रत्येक घराची अंगणे रंगीबेरंगी रांगोळ्यांनी सजली असून, घराच्या उंबरठ्यावर आणि तुळशीवृंदावनाजवळ पणत्यांच्या ज्योती प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात येत आहे.

पहाटेपासूनच घराघरांत दिवाळीच्या तयारीची लगबग पाहायला मिळते. अंगण स्वच्छ करून त्यावर आकर्षक रांगोळ्या काढल्या जातात. दारात आकाशकंदील, फुलांची सजावट आणि उंबरठ्यावर लावलेल्या पणत्यांमुळे संपूर्ण घराला प्रसन्नतेचा साज चढतो. सायंकाळ होताच एकामागोमाग एक पणत्या पेटवल्या जातात आणि त्यांच्या मंद, प्रसन्न प्रकाशाने कोकणातील घरे उजळून निघतात.

विशेष म्हणजे आधुनिक विद्युत रोषणाईच्या युगातही मातीच्या पणत्यांचे महत्त्व सर्वत्र जपले आहे. मातीच्या पणतीतील तेलाचा सुगंध, लुकलुकणारी ज्योत, अंगणातील रांगोळी आणि घराघरांतून दरवळणारा फराळाचा सुगंध यामुळे दिवाळीच्या आनंदाला वेगळीच किनार लाभते.

गावातील वाड्या-वस्त्यांवरही दिवाळीचा हा उत्साह अनुभवायला मिळत आहे. परंपरेचा वारसा जपत नव्या पिढीनेही रांगोळी आणि पणत्यांच्या माध्यमातून दिवाळीचा आनंद लुटला आहे. त्यामुळे कोकणातील दिवाळी आजही साधेपणातला सुंदरपणा आणि संस्कृतीची श्रीमंती जपणारा उत्सव ठरत आहे.

रांगोळीचे रंग, पणत्यांचा प्रकाश अन् माणसांच्या चेहऱ्यावरील आनंद अशा या मंगलमय वातावरणात दिवाळी खऱ्या अर्थाने उजळून निघाली आहे.

दीपावलीनिमित्त संगमनेरचे रस्ते झाले चकाचक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : मा.महसूल व कृषीमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर विकसित आणि वैभवशाली ठरले आहे. संगमनेर शहरात येणाऱ्या चारही बाजूच्या रस्त्यांचे त्यांनी चौपदरीकरण व सुशोभीकरण केले आहे नव्याने नगरपालिकेच्या स्वच्छता विभागात दाखल झालेल्या स्वीपिंग मशीनने शहरातील रस्त्यांची स्वच्छता केली असून दीपावलीच्या निमित्ताने सर्व रस्ते अत्यंत सुंदर आणि चकाचक झाले आहे. माजीमंत्री बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून संगमनेर नगर परिषदेने नव्याने अडीच कोटींचे स्वीपिंग मशीन, नगरपालिकेचे एक स्वीपिंग मशीन, दहा घंटागाडी, चार ट्रॅक्टर स्वच्छतेसाठी दाखल झाले आहेत. या लोकार्पणाच्या कार्यक्रमात माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी नगराध्यक्ष डॉ.मैथिलीताई तांबे व उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरपरिषदेचे अधिकारी यांना सूचना केल्या होत्या त्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सर्व रस्ते स्वच्छ करा. यानंतर आमदार सत्यजित तांबे व सभापती किशोर टोकसे व इतरांनी स्वतः उभे राहून साफसफाईची पाहणी केली. संगमनेर बस स्थानक हा हॅपी हायवे जो लक्ष्मी रोड नावाने ओळखला जातो तो अत्यंत सुंदर पद्धतीने स्वच्छ केला आहे. याचबरोबर विविध सहकारी संस्थांनी या रस्त्यावर डिव्हायडर मध्ये असलेल्या झाडांची छाटणी करून ते आकर्षक बनवले आहे.

लोणीत रंगली 'दिवाळी पहाट'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : सहकाराची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोणी येथे दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'दिवाळी पहाट' या संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील उदयोन्मुख गायक आणि वादक कलाकारांनी आपल्या सुरेल सादरीकरणातून पहाटेच्या प्रसन्न वातावरणात संगीताची अविस्मरणीय मैफल रंगवली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात 'केव्हातरी पहाटे', 'मातीमध्ये दरवळणारे', 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'रेशमाच्या रेघांनी', 'घेई छंद मकरंद', 'स्वामी कृपा कधी करणार' अशा विविध लोकप्रिय नाट्यगीत, भावगीत आणि भक्तिगीतांचे सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक गीताला रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

संकेत दरकदार, स्नेहा निर्मळ, दीपक वाघ, दुर्गा आगाशे यांच्यासह ज्येष्ठ गिटार वादक प्रदीप अडवणकर, तबला वादक अनिल डोळे, नकुल भगत, पखवाज वादक हनुमान बैरागी आणि कीबोर्डवर नरेंद्र साळवे या कलाकारांनी मराठी संगीत विश्वातील अजरामर गीतांनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

ऐन दिवाळीत मालुंजा येथे गोठ्याला आग; चार गाईंचा होरपळून मृत्यू । आग विझविताना शेतकरी भाजले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : ऐन दिवाळीच्या सणात श्रीरामपूर तालुक्यातील मालुंजे बुद्रुक येथे गोठ्याला अचानक आग लागून चार गाईंचा होरपळून मृत्यू झाला.

या आगीत अन्य चार गाई गंभीर जखमी झाल्या असून, आग विझविण्याचा प्रयत्न करताना शेतकरी सूर्यभान पवार हे चेहरा व हात भाजल्याने जखमी झाले आहेत. या घटनेमुळे पवार कुटुंबावर ऐन सणासुदीच्या काळात दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मालुंजे बुद्रुक येथे शनिवारी गोठ्याला अचानक आग लागली. आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने गोठ्यात बांधलेल्या जनावरांना बाहेर काढण्याची संधी मिळाली नाही. या आगीत चार गाईंचा होरपळून मृत्यू झाला, तर अन्य चार गाई गंभीररीत्या भाजल्या. आग विझविण्यासाठी धावपळ करताना सूर्यभान पवार यांच्या चेहरा व हाताला भाजल्याने त्यांना दुखापत झाली. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

गोठ्याजवळ विद्युत जोडणी नसल्याने आग नेमकी कशामुळे लागली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच सरपंच व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

दिवाळीची सुट्टी असल्याने सोमवारी घटनास्थळाचा पंचनामा करण्यात येणार असल्याचे समजते. या आगीत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

शुभ दिपावली

सहकारातुन समृद्धी

बाबासाहेब कवाद
निघोज नागरी सहकारी पतसंस्था
मुख्य कार्यालय : निघोज, ता.पारनेर,जि.अ.नगर



संस्थापक
बाबासाहेब कवाद

२८ ऑक्टोबर २०२६ अखेर आर्थिक स्थिती

ठेवी	३५० कोटी ०१ लाख	निधी	५० कोटी ०० लाख
कर्ज	२३२ कोटी ९५ लाख	गुंतवणुक	१८२ कोटी १८ लाख
भागभांडवल	८ कोटी १० लाख	मालमत्ता	५ कोटी ४० लाख
एकूण व्यवसाय	५८२ कोटी ९६ लाख	नफा	४ कोटी ७४ लाख

सोनेतारण कर्ज १ तोळ्यास रु.९०,०००/- कर्ज व्याजदर ९ %*

* इतर कर्ज व्याजदर ११ %*
* सर्वसामान्य ठेवीदार ९ %* व्याजदर
* जेष्ठ नागरिक,विधवा व अपंग ठेवीदारांसाठी ९.५० %* व्याजदर (*नियम व अटी लागू)

उपलब्ध सुविधा

■ ISO:9001-2015 प्रमाणित पतसंस्था ■ RTGS / NEFT सुविधा ■ कोअर बँकींग सुविधा
■ लॉकर सुविधा ■ मोबाईल बँकींग सुविधा ■ एसएमएस बँकींग सुविधा
■ निघोज शाखेत सकाळी ८ ते रात्री ८ वा. १२ तास (३६३ दिवस) सेवा

मुख्यकार्यकारी अधिकारी श्री.दत्तात्रय रंभाजी लंके
व्हा.चेअरमन श्री.नामदेव आबाजी थोरात
चेअरमन श्री.वसंत बाबासाहेब कवाद
सर्व संचालक मंडळ,सर्व कर्मचारी वृंद, सभासद व हितचिंतक

शाखा विस्तार : निघोज, जवळा, अळकुटी, वाडेगव्हाण, सुपा, शिरुर, पारनेर, चंदननगर , शिक्रापुर, लोणीमावळा, मलठण, आळेफाटा, टाकळीहाजी, वाघोली व कोरेगाव भिमा

ए.एन.आर.एस.एम.आर/ आर.एस.आर (सी आर) २८३७ सन २००७ दि ३०/५/२००७



गुरुदेव डॉ.काटेस्वामीजी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, श्रीरामपुर

प.पू.गुरुदेव

प.पू.काका महाराज - संस्थापक

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनास तसेच दिवाळी व दीपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...

मा.श्री.अनिरुध्द नारायणराव महाले
चेअरमन

मा.श्री.दादासाहेब पाराजी राऊत
व्हा.चेअरमन

मा.श्री.कल्पेश जयंतभाई चोथाणी
लोन कमेटी चेअरमन

मा.श्री.संदिप बाळकृष्ण पटारे
सेक्रेटरी

व्याजदर १०% वार्षिक

संचालक मंडळ

श्री.बी.एन. पवार पाटील । श्री. बापुसाहेब गायकवाड । श्री. डॉ. प्रशांत सुरेशचंद्र लखोटिया । सौ. शोभा कसार । सौ. रेखा पोकळे । श्री. संपत पोकळे । श्री. नंदकुमार धनवटे

सौ. गिरीजा टंकसाळे (व्यवस्थापिका) श्री. दिपक दवंगे (शाखा व्यवस्थापक)

सभासद व कर्मचारी वृंद

श्रीराम मंदीर रोड, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर. फोन नं.०२४२२-२२१००५, मोबा.९१५६६७६५६५

मा.आ.श्री.हेमंतजी ओगले साहेब, मा.आ.श्री.भानुदासजी मुरकुटे साहेब व श्रीरामपूर चे नगराध्यक्ष श्री.करणदादा ससाणे यांच्या कुशल नेतृत्वाखाली

कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीरामपूर


मा.ना.श्री.बाळासाहेब थोरात साहेब


मा.आ.श्री.भानुदासजी मुरकुटे साहेब


मा.आ.श्री.हेमंतजी ओगले साहेब


मा.श्री.करणदादा ससाणे साहेब


मा.श्री.सुधीर नवले पा.
सभापती
कृषी उत्पन्न बाजार समिती, श्रीरामपूर

ठळक वैशिष्टे– १) विश्वासपात्र H.P कंपनीचा सुसज्ज पेट्रोलपंप २४ तास चालू
२) श्रीरामपूर भाजीपाला, फळे चिंच व भुसार, डेली मार्केट
३) श्रीरामपूर कांदा गोणी दर सोमवार, बुधवार व शुक्रवार व मोकळा कांदा मार्केट दर सोमवार ते शुक्रवार
४) श्रीरामपूर भाजीपाला, फळे मार्केट पहाटे ५ वाजतां लिलाव सुरूवात
५) सीसीआय मार्फत कापूस खरेदी केंद्र ६) शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र
७) नागिन पाने मार्केट दर शुक्रवार ८) जनावरे मार्केट दर रविवार
९) बेलापूरगांव भुसार मार्केट दररोज १०) टाकळीभान भुसार मार्केट दररोज
११) टाकळीभान येथे कांदा गोणी वार मंगळवार व शुक्रवार, मोकळा कांदा मार्केट दर बुधवार, गुरूवार आणि शनिवार व रविवार
१२) शेतकऱ्यांना शेतमालाचे २४ तासाचे आत पेमेंट व्यवस्था ऑनलाईन पेमेंट सुविधा
१३) श्रीरामपूर, बेलापूर व टाकळीभान येथे ५०/६० टनी इलेक्ट्रॉनिक भुईकाटा
१४) धान्य ग्रेडींगची सुविधा उपलब्ध
१५) शेतमाल तारण कर्ज त्वरीत उपलब्ध ६% व्याज दराने ६ महिन्यांकरीता
१६) लायसन्स होल्डर मापाडयाकडून शेतमालाचे चोख वजनमाप

मा.श्री.टी.एस.भोसले साहेब, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपुर

श्री.मोरगे व्ही.एल
प्रभारी सचिव

श्री.सुधीर वेणूनाथ नवले पा.
सभापती

संचालक मंडळ

श्री. सचिन रंगराव गुजर पा.
श्री. दशरथ विठोबा पिसे
श्रीमती. विद्याताई भाऊसाहेब दामाडे
श्री. सोन्याबापू गोविंद शिंदे पा.
श्री. मयुर अशोकराव पटारे पा.
श्री. राजेंद्र अंबादास पाऊलबुद्धे पा.
श्री. राजु काशिनाथ चक्रनारायण

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनास तसेच दिवाळी व दीपावली पाडव्याच्या शेतकरी बांधवास हार्दिक शुभेच्छा...

दै.राष्ट्र सह्याद्री वर्धापन दिनास तसेच दिवाळी व दीपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...

श्री साई एज्युकेशन सोसायटी संचलित

श्री साई इंग्लिश मिडियम स्कूल
बेलापुर ता. श्रीरामपूर. जि. अहिल्यानगर

श्री. कैलास मदनलाल चायल
संस्थापक अध्यक्ष - श्री साई इंग्लिश मिडियम स्कूल
संस्थापक अध्यक्ष - श्री साई पावन प्रतिष्ठान
- विश्वस्त मंडळ -

श्री.राजेंद्र रामदयाल लखोटीया
सचिव

सौ.अस्मिता घागरे
प्रिन्सिपल



शिवसेना

दिवाळी व दीपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा

श्री.राजेंद्र देवकर
मा. शिवसेना जिल्हाप्रमुख, उत्तर अहिल्यानगर
चेअरमन : श्री किसनगीरी बाबा ग्रामीण विकास व शैक्षणिक प्रतिष्ठान, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर.

समृध्दी प्रिन्टर्स प्रा.लि. | श्रीरामपूर जि. अहिल्यानगर
दै.सार्वमत सार्वमत टाईम्स | साप्ताहिक सामना

